# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १४ जुलै, २०१५ / आषाढ २३, १९३७ ( शके )**

**(१) मुख्यमंत्री**
**(२) गृहनिर्माण, खनिकर्म व कामगार मंत्री**
} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८८**

---

**परळ विभागातील (मुंबई) बोगदा चाळींच्या बेकायदेशीर पुनर्विकासाबाबत**

**(१) * २२२३२ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ विभागातील (मुंबई) बोगदा चाळींच्या बेकायदेशीर पुनर्विकासामुळे सुमारे २०५ मराठी कुटुंबिय बेघर झाल्याची घटना माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगदा चाळीचा पुनर्विकास प्रकरणी महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष आणि सदस्यांनी विकास नियंत्रण नियमावली बेकायदेशीररित्या फेरफार करुन पुनर्विकासास मंजूरी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुनर्विकासामध्ये श्री.रामेश्वर सांभारी या विकासकाने प्रशासकीय अधिकारी यांच्या संगनमताने रहिवाशांच्या स्वाक्षरीचा गैरमार्गाने वापर करुन महानगरपालिकेला पुनर्विकासाकरिता खोटी कागदपत्रे सादर केल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बोगदा चाळीच्या बेकायदेशीर पुनर्विकासाची शासनस्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व सद्यःस्थितीत बेघर असणा-या ८८ मराठी कुटुंबियांना परळ विभागातच पर्यायी जागेची व्यवस्था करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) परळ विभागातील बोगदा चाळींचा पुनर्विकास बृहन्मुबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३(९) च्या जुन्या तरतूदी अन्वये प्रस्तावित आहे. पुनर्विकास प्रस्तावामध्ये एकंदर २०६ भाडेकरुंचा समावेश आहेत. इरादापत्रातील अटी व शर्तीनुसार सर्व भाडेकरुंची पर्यायी व्यवस्था विकासकाने करावयाची आहे. यापैकी १९९८ पूर्वी महानगरपालिकेतर्फे ४३ भाडेकरुंचे वाणी चाळ व इतरत्र स्थलांतरण करण्यात आलेले आहे. इमारतीचे महानगरपालिकेतर्फे वास्तूपरिक्षणाअंती इमारती मोडकळीस आलेल्या असल्याचे अहवाल प्राप्त झाल्याने महानगरपालिकेकडून धोकादायक जाहीर करण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे ७८ भाडेकरुंची विकासकाने पर्यायी व्यवस्था केलेली आहे. ७७ भाडेकरुनी विकासकाने देऊ केलेल्या सदनिका स्वीकारल्या नाहीत व त्यांनी महानगरपालिकेकडून पर्यायी व्यवस्थेची मागणी केली असता सदर ७७ सदनिकांचे भाडे विकासकाकडून स्वीकारुन भाडेकरुंना महापालिकेकडील माहूल येथील प्रकल्पबाधितांच्या सदनिका संक्रमण शिबिर म्हणून वितरीत करण्याकरिता महानगरपालिकेच्या विभाग कार्यालयाकडे दिलेल्या आहेत. ८ वाणिज्य भाडेकरुंनी इमारत निष्कासित करणेपूर्वी सदनिका रिक्त करण्याची तयादी दर्शविलेली आहे. पुनर्विकास प्रकल्पातील भाडेकरुंची पर्यायी व्यवस्था करणेत आलेली आहे.

(२) नाही.

(३) रहिवाशांच्या खोट्या स्वाक्षरीबाबत संस्थेचे पदाधिकारी श्री.रामचंद्र गो. दुदम यांनी भोईवाडा पोलीस स्थानकात तक्रार केली असता त्याबाबत तपास करणेत येवून तक्रारीमध्ये तथ्य नसलेबाबत वरीष्ठ पोलीस निरीक्षक, भोईवाडा यांच्या दिनांक १२.१.२०१३ रोजीच्या अहवालात नमूद असलेचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(४) व (५) करी रोड (परळ) येथील महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या २०४ प्रकल्पबाधितांच्या सदनिकांपैकी ५० टक्के सदनिका के.ई.एम. रुग्णालय व नायर रुग्णालय येथील धोकादायक सेवानिवासस्थानांमधील शिकाऊ डॉक्टर यांचेकरीता तसेच ५० टक्के सदनिका डॉ.शिरोडकर मंडई या धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतीमधील भाडेकरु/कर्मचारी यांना देण्यात आलेल्या असल्याने बोगदा चाळीतील ७७ भाडेकरुना त्या देता येणे शक्य होणार नाही.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार व भाडेकरुंनी केलेल्या विनंतीनुसार बोगदा चाळी येथील ७७ भाडेकरुंना त्यावेळी महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या माहुल-चेंबुर येथील प्रकल्पबाधितांच्या सदनिका संक्रमण शिबिर म्हणून उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

-----------------

**खराबवाडी चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील पथेजा ब्रदर्स फोर्जिंग अॅण्ड स्टॅम्पींग लि.कंपनी बंद पडल्याबाबत**

**(२) * २०५३० श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खराबवाडी चाकण (ता.खेड, जि.पुणे) येथील पथेजा ब्रदर्स फोर्जिंग अॅण्ड स्टॅम्पींग लि. या १० वर्षापासून बंद पडलेल्या कंपनीतील ६०० कामगारांची देणी मिळण्याबाबतच्या मागणी संदर्भात दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास कामगार राज्यमंत्री यांनी बैठक घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कामगारांची देय असलेली देणी देण्याबाबत निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) दिनांक २०/५/२०१५ रोजी बैठक घेण्यात आली हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने अवसायकाची नेमणुक केलेली असून सदर बाब न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कवठेएकंद (जि.सांगली) या भागात शोभेची दारु बनविणाऱ्या कारखान्यात स्फोट होऊन कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३) * १६४२३ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.धनजंय (सुधीर हरी) गाडगीळ (सांगली), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कवठेएकंद (ता.तासगांव, जि.सांगली) येथील ईगल फायर वर्क्स या शोभेच्या दारु कारखान्यात दिनांक ५ मे, २०१५ रोजी स्फोट होवून ११ जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार स्फोटात मृत झालेल्यांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, चौकशीअंती मृत्यू पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना शासनाने कोणत्या स्वरुपाची मदत केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय. मौजे कवठेएकंद (ता.तासगांव, जि.सांगली) येथील ईगल फायर वर्क्स या शोभेच्या दारु बनविणाऱ्या कारखान्यात दिनांक ४ मे, २०१५ रोजी स्फोट होऊन ११ जणांचा मृत्यू झाला आणि ३ जण जखमी झाले. हे खरे आहे.

(२) होय, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे.

(३), (४) व (५) कारखान्यामध्ये शोभेची दारु (उदा.हवेत उडणारे फटाके) बनविण्याचे काम चालू असताना चुकीने लोखंडी वस्तू जमिनीवर पडून ठिणगी उडून लागलेल्या आगीमुळे स्फोट झाला. त्यावेळी शेडमध्ये काम करीत असणाऱ्या ७ जणांचा जागीच मृत्यू झाला. तसेच शेडजवळ उभा असलेला एक खरेदीदार व अन्य तिघे गंभीर जखमी झाले. वैद्यकीय उपचारादरम्यान त्या चार जणांचा मृत्यू झाला, असे आढळून आले.

चौकशीत असेही आढळून आले की, सदर कारखान्यात मंजूर साठवणूक क्षमतेपेक्षा अवैधपणे अधिक स्फोटकांचा साठा करण्यात आला होता. तसेच एका शेडमध्ये क्षमतेपेक्षा अधिक कामगार काम करीत होते. कारखान्याचे नकाशे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून मंजूर न करता कारखान्यामध्ये उत्पादनाचे काम सुरु होते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात झालेल्या अनियमिततेबाबत भोगवटादाराविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

स्फोटामध्ये मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी मा.आयुक्त, श्रमिक नुकसान भरपाई, कामगार न्यायालय, सांगली, यांच्याकडे प्रकरण सादर करण्यात आले असून त्याबाबत दिनांक ०१.०७.२०१५ रोजी भोगवटाराविरुध्द नोटीस बजावली आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणीबाबत

**(४) * १९४०३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी बाबतचे सन २०१० ते २०१५ पर्यंत कोणतेही निश्चित सुत्र नसल्याचे मुंबईकराकडून तब्बल रुपये १२०० कोटी रक्कम ज्यादा घेतले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१० ते २०१५ पर्यंत कर आकारणीबाबत निश्चित सुत्र नसण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) सदर ज्यादा आकारण्यात आलेला मालमत्ता कर नागरिकांना प्रशासन परत करणार आहे काय, कशा पध्दतीने रक्कम परत करणार आहात, सदर ज्यादा रकमेचे महानगरपालिका काय करणार आहे,

(४) असल्यास, अशा पध्दतीच्या परत चुका होऊ नयेत म्हणून शासनाने काय उपाययोजना केली वा करीत आहे,

(५) नसल्यास, उपाययोजना न करण्याचे नेमकी काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दिनांक ०१.०४.२०१० पासून मनपा अधिनियम १८८८ च्या कलम १४०अ अन्वये भांडवली मूल्याधारित करप्रणाली अंमलात आणण्यात आली. तसेच कलम १५४(१ब) अन्वये भांडवली मूल्य निश्चितीचे नियम स्थायी समितीच्या दिनांक ०९.०५.२०१२ रोजीच्या ठरावान्वये निश्चित करण्यात आले आहेत. सदर नियमावलीमध्ये नियम क्रमांक २१ अन्वये भांडवली मूल्य निश्चितीचे सूत्र देण्यात आले आहे.

मालमत्ता कर आकारणीचे सन २०१० ते २०१५ या कालावधीत निश्चित सूत्र असल्याने मुंबईकरांकडून जास्त रक्कम घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लायन ओक इंडिया कंपनीच्या नावाखाली चांगल्या परताव्याचे अमिष दाखवून करण्यात आलेल्या फसवणूकीबाबत

**(५) * २४६५८ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लायन ओक इंडिया कंपनीच्या नावाखाली चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांची १० कोटी रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी अभिनेत्री मॉडेल लिना पॉल आणि तिचा मित्र शेखर चंद्रशेखर यांच्यासह एकूण सहा जणांना मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दिनांक २ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने फसवणूक झालेल्या नागरिकांना त्यांनी गुंतवलेली रक्कम परत करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. सदरची अटक दिनांक ०२.०६.२०१५ रोजी केलेली नसून त्यापूर्वी दिनांक २९.०५.२०१५ रोजी मॉडेल अभिनेत्री लिना मारीया पॉल आणि तिचा मित्र शेखर चंद्रशेखर यांना अटक करण्यात आली आहे व दिनांक ०१.०६.२०१५ रोजी उर्वरीत चार आरोपी यांना अटक करण्यात आलेली आहे.

(२) याप्रकरणी दिनांक २९.०५.२०१५ रोजी आगुवि गुन्हा नोंद क्रमांक ३३/२०१५ कलम १२० (ब), सह ४२० भादंवि सह ३, ४ प्राईज चीटस अॅड मनी लॉडरींग बॅनिंग अॅक्ट सह कलम ३ एमपीआयडी अॅक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन, याबाबत तपास सुरु आहे. फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांना त्यांनी गुंतवलेली रक्कम अद्याप परत करण्यात आली नसून गुन्ह्यातील तपास पुर्ण झाल्यावर याबाबत कायदेशीर कारवाई सुरु करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील आय.टी.कंपनीत नोकरी लावण्याचे**
**आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत**

**(६) * १८१५८ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील नामांकित आय.टी.कंपनीत नोकरी लावण्याचे आमिष दाखवून १३ उमेदवारांना बनावट नियुक्ती पत्र देवून सुमारे १३ लाख रुपयांची रक्कम घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी हिंजवडी पोलीसांनी २ व्यक्तींना नुकतीच अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी कॉग्नीझंट कंपनी, हिंजवडी येथे नोकरीस लावतो असे सांगून एकंदरीत १३ जणांकडून रु.१२ लाख घेतल्याची तक्रार हिंजवडी पोलीस स्टेशन येथे फिर्यादीने केल्यानुसार गु.र.क्र.१०८/२०१५, भा.दं.वि. कलम ४१७, ४१९, ४२०, ४६५, ४६८, ४७१ नुसार दिनांक १२ एप्रिल, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी चौकशीअंती दोन आरोपींना दिनांक २५ एप्रिल, २०१५ रोजी अटक करण्यात आली असून अन्य दोन आरोपींना अद्यापही अटक करण्यात आलेली नाही. अटक आरोपींच्या ताब्यातुन कॉग्नीझंट कंपनीचे पगार माहितीपत्रक, जाहिरातीची पावती, कोरे ॲप्लीकेशन फॉर्म जप्त करण्यात आले आहे. सदर प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने डीसीरुल ३३ (२४) अंतर्गत शहरात वाहन पार्किंग उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७) * २०१६२ श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.नितेश राणे (कणकवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने डीसीरुल ३३ (२४) अंतर्गत शहरात ३०, पूर्व उपनगरात १० व पश्चिम उपनगरात १९ अशा ५९ बिल्डरांना जादा एफएसआय देवून ४२ हजार ६६४ मोटार सायकली व ४ चाकी गाड्या उभा राहतील एवढे पार्किंग उपलब्ध करुन देण्याची अट घातली होती, हे खरे आहे काय,

(२) आतापर्यंत लोअर परेल, अपोलो मिल, कांजूरमार्ग गावं, तुंगागाव, साकी विहार येथे पार्किंग उपलब्ध झाली असून बहुसंख्य बिल्डरांनी पार्किंग उपलब्ध करुन दिलेले नसल्यामुळे ४ वर्षापूर्वी तत्कालीन पालिका आयुक्त यांनी नवीन इमारत बांधताना त्यांच्या ४ मजल्यापर्यंत पार्किंग करुन ते पालिकेला हस्तांतरीत करण्यात यावे, असा आदेशही दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील ६ वर्षात ४२ हजार ६६४ ऐवजी फक्त १ हजार ४३४ गाड्यांसाठीच पार्किंग उपलब्ध करुन देण्यात आली असून त्यामुळे विकासकांकडून पालिकेची फसवणूक झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने विकास नियंत्रण नियमावली ३३(२४) अंतर्गत शहर विभागात २९, पूर्व उपनगरात १० व पश्चिम उपनगरात १८ असे एकूण ५७ वाहनतळांचे प्रस्ताव मंजूर केलेले आहेत. त्यानुसार ४१,८६४ इतक्या वाहनतळ जागा उपलब्ध होणार आहेत.

(२) होय.

(३) वाहनतळ बांधून महानगरपालिकेस हस्तांतर केल्यानंतरच त्यापोटी अनुज्ञेय असलेल्या प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक पूर्णत: अनुज्ञेय होत असल्याने अशी बाब नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानखुर्द, गोवंडी (मुंबई) येथील विविध विभागातील कामगारांना सोयीसुविधा देण्याबाबत

**(८) * २२८५८ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द, गोवंडी (मुंबई) स्थानिक विभागातील विविध नागरी विकासाची उदा. पाणी पुरवठा, मल: निसारण, घन कचरा निर्मूलन, क्षेपणभूमी विकास, कच-याची विल्हेवाट व प्रक्रिया, बायोगॅस प्रकल्प तसेच संबंधित क्षेत्रातील कामगारांच्या सोयीसुविधा इत्यादींसाठी स्थानिक जागरुक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री (नगरविकास) मा.राज्यमंत्री (नगरविकास), जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर), आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका, अतिरिक्त आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका पूर्व उपनगरे, उपायुक्त (बृ.मुं.मनपा/पूर्व उपनगरे), सहाय्यक आयुक्त (एम/पूर्व बृ.मुं.मनपा) यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी माहे मे, २०१५ अखेर पर्यंत कोणती कार्यवाही पूर्ण करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदरचे काम किती कालावधीत हाती घेण्यात येईल वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एम/पूर्व विभागातील घनकचरा व्यवस्थापन खात्याकडे स्थानिक जागरुक नागरीक, सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांच्यामार्फत मानखुर्द, गोवंडी विभागातील घनकचरा निर्मुलन, कचऱ्याची विल्हेवाट इत्यादीबाबतची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२) व (३) मानखुर्द, गोवंडी परिसरातील दैनंदिन साफसफाईकरिता स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान योजनेअंतर्गत अशासकीय संस्था/महिला बचतगट इ. ची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर संस्था/बचतगटांमार्फत वसाहतींमधील अंतर्गत रस्त्यांची साफसफाई, छोट्या गटाराची साफसफाई, घरोघरी कचरा संकलन इ. कामे दैनंदिन स्वरुपात केली जातात.

तसेच सदर संस्थांच्या कामाचे दैनंदिन स्वरुपात पर्यवेक्षण केले जात असून, साफसफाईच्या कामात त्रुटी आढळल्यास संबंधित संस्थांवर मनपा नियमावलीनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येते.

मानखुर्द, गोवंडी परिसरातील कचरा संकलन केंद्रांवरील कचरा दैनंदिन स्वरुपात उचलला जावा याकरिता फेब्रुवारी, २०१५ पासून कचरा वाहतुक वाहनांची संख्या वाढविण्यात आली आहे.

तसेच देवनार क्षेपणभूमीकडे जाणारा रस्ता व जी.एम.लिंक रोड या दोन्ही रस्त्यांच्या साफसफाईचे काम अधिक प्रभावीपणे पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून रस्ते स्वच्छता योजनेअंतर्गत अतिरिक्त संस्थांची नियुक्ती मे, २०१५ पासून करण्यात आलेली आहे.

घनकचरा खात्यातील कामगारांना फेस मास्क, हॅण्ड ग्लोव्हज, रेनकोट, रीफ्लेक्टींग जॅकेट इत्यादी सुरक्षा साधनांचे वेळोवेळी वाटप करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कर्वेनगर, पुणे येथील नदीपात्रालगत अनधिकृत बांधकामे सुरु असल्याबाबत**

**(९) * २३६५६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्वेनगर पुणे येथील नदीपात्रालगत मोठया प्रमाणात भराव टाकून पत्राच्या शेड, मंगल कार्यालय अशी अनधिकृत बांधकामे सुरु असून राजरोसपणे नदी बुजविण्याचा प्रकार सुरु असतांना पाटबंधारे आणि महानगरपालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष करीत असल्याबाबतची तक्रार अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

भराव टाकून अनधिकृत बांधकामबाबतची तक्रार अतिरिक्त आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेली आहे.

(२) होय.

अतिरिक्त आयुक्त (वि.), पुणे महानगरपालिका यांनी स्थानिक लोकप्रतिनिधीसमवेत जागा पाहणी केली आहे. तक्रारीपुर्वी व तक्रारीनंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४७८ (१) अन्वये विनापरवाना बांधकामास व राडारोड्याबाबत रितसर नोटीस देवून अनधिकृत बांधकामे काढून टाकणेत आलेली आहेत. नदीपात्राच्या कडेने टाकण्यात आलेल्या राडारोड्याबाबत संबंधितांना दिलेल्या नोटीशीनुसार तीन ठिकाणचा राडारोडा काढला असून उर्वरित राडारोडा काढण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक येथे होणा-या कुंभमेळ्यासाठी येणा-या भाविकांना सोईसुविधा पुरविण्याबाबत**

**(१०) * १९१३५ श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.छगन भुजबळ (येवला), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे होणा-या कुंभमेळ्यासाठी येणा-या भाविकांची कुंचबणा होऊ नये म्हणून भक्तांना पुरेशा प्रमाणात सोईसुविधा पुरविण्यात यावेत असे आदेश मा.उच्च न्यायालयाने शासनास माहे एप्रिल, २०१५ च्या तिस-या सप्ताहात दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे होणा-या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या व्यवस्थेसाठी हजारो कर्मचा-यांना आपत्ती व्यवस्थापन विभागातर्फे प्रशिक्षण देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाशिक कुंभमेळ्याच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयासमोर विविध याचिका दाखल झाल्या असून यामध्ये मा.न्यायालयाने वेळोवेळी आदेश दिलेले आहेत. तथापि एप्रिल, २०१५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने असे विशिष्ट आदेश दिलेले नाहीत.

(२) कुंभमेळ्याच्या व्यवस्थेसाठी जिल्हा प्रशासनाने कर्मचा-यांना प्रशिक्षण दिले आहे.

(३) नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणा-या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या व्यवस्थेसाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या नियंत्रणाखाली कुंभमेळ्यासाठी येणा-या भाविकांना पुरेशा प्रमाणात सुविधा उपलब्ध करण्याबाबत नियोजन करण्यात येत आहे.

सदर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर खालील सोयी सुविधा साधूमहंत व भाविकांना पुरविण्यात येत आहेत.

- भाविकांसाठी पाण्याची व्यवस्था करण्यासाठी साधुग्राम येथे ५० एम.एल.डी. क्षमतेचे नविन जलशुध्दीकरण केंद्र उभारण्यात आले असून पाण्याच्या दोन नविन टाक्या बांधल्या आहेत. याशिवाय नाशिक रोड येथील जलशुध्दीकरण केंद्राची क्षमता १८ एम.एल.डी. ने वाढविण्यात आली आहे.
- शौचालयाची व्यवस्था, करण्याकरीता साधुग्राम येथे ९००० शौचालय बांधण्यात आली असून, याशिवाय १०००० पोर्टेबल शौचालय उभारण्यात येत आहेत.
- शहरातील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ५४१ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची, नाशिक महानगरपालिकेमार्फत १०३ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची व त्र्यंबक नगरपरिषदेमार्फत १७ कि.मी. लांबीच्या रस्त्यांची कामे घेण्यात आली आहेत. तसेच ७२५ एकर क्षेत्रामध्ये पार्किंगची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.
- शहरात दिशा-दर्शक फलक लावण्यात येत आहेत.
- भाविकांसाठी वेद्यकीय सेवा, स्वच्छता व आरोग्य विषयक पुरेशा सेवा महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्ह्यात ५३ हजार १५ बालके आधारकार्डाच्या प्रतीक्षेत असल्याबाबत**

**(११) * २३३५२ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात बालकांना प्रवेशाकरीता आधारकार्डाची सक्ती केली असून अद्‌याप ५३ हजार १५ बालके आधारकार्डाच्या प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आधारकार्ड काढण्याची मुदत माहे जून, २०१५ पर्यंत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मुदत शासन वाढविणार आहे काय, त्याचा कालावधी किती आहे,

(४) उक्त प्रकरणी अद्‌याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारण काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२), (३) व (४) नागरीकांना आधार कार्ड देणे ही निरंतर प्रक्रिया आहे. आतापर्यंत भंडारा जिल्ह्यामध्ये ० ते ६ वर्ष वयोगटातील ९३,३५७ बालकांपैकी ४३,३८४ बालकांचे आधार कार्ड देणेबाबत कार्यवाही पुर्ण झाली असुन उर्वरितांना आधार कार्ड देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

-----------------

**घाटकोपर (मुंबई) येथे गस्त घालत असलेल्या तीन पोलीस उपनिरीक्षकांना बेदम मारहाण केल्याबाबत**

**(१२) * २२५३५ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथे हवेली ब्रीज जवळ ॲन्टी चैन स्नॅचिंग पॉईंटवर गस्त घालत असलेल्या तीन पोलीस उपनिरीक्षकांना चौघांनी बेदम मारहाण केल्याचे दिनांक २३ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार आरोपींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय. सदर प्रकरणी दि.२४.५.२०१५ रोजी घाटकोपर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.२०३/२०१५ कलम १४३, १४७, १४९, ३३२, ३५३, ५०४, ५०६ भारतीय दंडविधान संहिता सह कलम ११९, १७७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील आरोपींना दि. २४.५.२०१५ रोजी अटक करण्यात आली असून तपास चालू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## महालक्ष्मी येथील रेसकार्सची जागा महानगरपालिकेने रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबला भाडे करारावर दिल्याबाबत

**(१३) * १६८८० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालक्ष्मी येथील रेसकोर्सची जागा महानगरपालिकेने रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लबला भाडे करारावर दिली. सदरील भाडे करार हा दिनांक ३१ मे, २०१३ रोजी संपुष्टात आला असूनही रॉयल वेस्टर्न अनधिकृतपणे जागेचा वापर करीत असल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जागेत अजूनही घोड्यांची स्पर्धा, विवाहांबरोबरच अनेक समारंभ तसेच उपहारगृह चालविण्यासाठी गॅलॉप्सला दिलेली जागा या सर्व कारणांमुळे क्लबविरोधात कारवाई करण्याची मागणी आयुक्त महानगरपालिका यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय.

(३) मे.रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. यांच्या संपुष्टात आलेल्या मक्ता करारान्वये घोड्यांच्या शर्यतीत व विवाह समारंभास अनुमती आहे.

मे.रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लि. यांनी मे. बीजेआर (गॅलॉप) यांच्याशी सन २०३० पर्यंत गॅलॉप्स रेस्टॉरंट चालू ठेवण्याबाबतचा करार केल्याचे निदर्शनास आल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने मे.बीजेआर (गॅलॉप) यांच्या विरुध्द मुंबई महापालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४(४) अनुसार कारवाई करण्यात आली आहे.

तथापि मे.बीजेआर (गॅलॉप) यांनी सदर कारवाईस न्यायालयात आव्हान दिले असून मा.न्यायालयाने सदर कारवाईस स्थगिती दिलेली आहे.

सदर जागेच्या नुतनीकरणाच्या अनुषंगाने शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून काही मुद्दयांबाबतची माहिती मागविलेली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी पुढील योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातून पाच कुख्यात कैदी पळाल्याबाबत**

**(१४) * १७३१० श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री. लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मध्यवर्ती कारागृहातील ढिसाळ सुरक्षा व्यवस्था व गैरव्यवहारांमुळे कारागृहातून दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास पाच कुख्यात कैदी पळाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महाराष्ट्राच्या विविध कारागृहांमधून सन २००९ ते २०१३ या काळात २३ कैदी पळून गेल्याचे राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्यूरोने जारी केलेल्या अहवालात म्हटले असून पोलीस कोठडी व बाहेरून पळून जाणाऱ्या कैद्यांची संख्या २५ असून, संपूर्ण देशभरातील आकडेवारी पाहता महाराष्ट्राचा क्रमांक सहावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी, कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच राज्यात कैदी पळून जाण्याचे प्रमाण वाढले असून सदर प्रकार रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय.
(३) बंदी पलायनाच्या घटनांच्या चौकशीअंती दोषी अधिकारी/कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. सदर अधिकारी/कर्मचा-यांना त्यांच्या नियुक्ती अधिका-यामार्फत त्यांचे विरुध्द सिध्द झालेल्या दोषानुरुप शिक्षा ठोठावण्यात आली आहे.
(४) बंदी पलायनाचे प्रकार रोखण्याकरिता उपाययोजना निश्चित करण्यासाठी पोलिस महासंचालक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. सदर समितीने सुचविलेल्या प्रमाणे निम्न निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

- दोषी अधिकारी व कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचे विरुध्द प्रस्तावित विभागीय चौकशीस शासनाने मान्यता दिली आहे व त्यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.
- स्थानिक पोलिसांमार्फत राज्यातील कारागृहांची प्रथम सुरक्षा पडताळणी करण्यात आली आहे व सदर तिमाही प्रक्रिया पुढे कार्यरत ठेवण्याचे निदेश देण्यात आले आहेत.
- कारागृहाच्या वॉच टॉवरच्या संख्येत वाढ करुन निगराणी प्रक्रियेसाठी सर्च लाईट्स व बायनोक्युलर्सची व्यवस्था करण्यात येत आहे.

- नागपूर मध्यवर्ती कारागृह परिसरात कार्यरत शासकीय मुद्रणालय इतरत्र स्थलांतरीत करण्यात येत आहेत.
- कारागृहातील बंद्यांना वैद्यकीय उपचारासाठी इतरत्र नेण्यापेक्षा कारागृहीन वैद्यकीय व्यवस्था सुदृढ करण्यासाठी कारागृहातील मंजूर वैद्यकीय अधिका-यांची पदे तातडीने भरण्यात येत आहेत.
- बंद्यांची न्यायालयीन ने-आण टाळण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सची व्यवस्था कार्यान्वित करण्यात आली असून सदर यंत्रणेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी दिनांक १२.५.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील रिंगरोड प्रकल्प मार्गी लावण्याबाबत**

**(१५) * १७३३३ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील रिंगरोड (हाय कॅपॅसिटी मास ट्रान्झिट रुट) हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) नोडज एजन्सी म्हणून काम पहाणार असल्याचे दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या विविध विभाग आणि अखत्यारितील संस्था यांच्याकडील जमिनींचे इतर रिंगरोडसाठी तात्काळ भूसंपादन करावे अशा सूचना पालकमंत्री, पुणे यांनी दिल्या आहेत, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकल्प किती कालावधीत पूर्ण होणार आहे,

(४) अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पुणे शहरातील रिंगरोड (हाय कपॅसिटी मास ट्रान्झिट रुट) हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी पालकमंत्री, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ मे, २०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये या विषयी चर्चा झाली. तथापि, असा कोणताही अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही.

(२) होय.

दिनांक १८ मे, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत पालकमंत्री, पुणे यांनी तशा सूचना केल्या ही वस्तुस्थिती आहे.

(३) व (४) सदर प्रकल्पासाठी लागणारी खाजगी व सरकारी जमीन पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित होणे आवश्यक आहे.

सदर प्रकल्पासाठी लागणाऱ्या खाजगी जमिनी संपादन करण्याकरिता जिल्हाधिकारी, पुणे यांचे स्तरावर कार्यवाही सुरु आहे. तसेच शासकीय जागा ताब्यात घेणेसाठी संबंधित विभागाकडे पुणे महानगरपालिकेमार्फत प्रस्ताव दाखल केले असून, त्यासाठी पाठपुरावा सुरु आहे.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या ४० हजार कोटींच्या ठेवी विविध बँकामध्ये ठेवल्याबाबत**

**(१६) * २३४०२ श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील सर्वात श्रीमंत असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या तब्बल ४० हजार कोटीच्या ठेवी विविध बँकामध्ये ठेवल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेकडे कोट्यवधी रुपये असतांनाही गेल्या २० वर्षापासून महानगरपालिकेने घेतलेल्या कर्जाच्या व्याजापोटी रुपये भरून महानगरपालिका कर्जबाजारी होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, मुंबई महानगरपालिकेने रुपये २९६१ कोटी ३१ लाखाचे कर्ज कोणाकडून घेतले आहे व सदर कर्जातून मिळालेला पैसा महानगरपालिका कोणत्या कामावर खर्च करते तसेच कर्जमुक्त होण्यासाठी महानगरपालिका आवश्यक असलेल्या ठेवी ठेवून अनावश्यक ठेवी मोडण्याबाबत कोणती निर्णयात्मक कार्यवाही करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ३१.०३.२०१५ रोजी मुंबई महानगरपालिकेची मुदत ठेवीतील गुंतवणूक रुपये ४३२८५.८६ कोटी एवढी आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिका कर्जबाजारी नाही. दिनांक ३१.०३.२०१५ रोजी शिल्लक असलेल्या रु.२९६१.३३ कोटी कर्जापैकी रु.२२९७.०२ कोटी एवढा हिस्सा हा मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (BEST) यांचा आहे. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेचे कर्ज रु.६६४.३१ कोटी एवढेच आहे.

(३) मुंबई महानगरपालिकेचे रु.२९६१ कोटी ३१ लाखाचे शिल्लक कर्ज राज्य शासन, एम.एम.आर.डी.ए. आणि अंतर्गत निधीतून घेतलेले आहे.

सदर कर्जातून मिळालेला पैसा मुंबई महानगरपालिकेच्या विविध भांडवली कामांसाठी खर्च केला जातो.

महानगरपालिकेच्या ठेवींमध्ये कर्मचा-यांचा भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन या दीर्घ मुदतीच्या दायित्वांचा तसेच मालमत्ता पुनर्स्थापना निधी, घसारा निधी, भूसंपादन निधी, पायाभूत सुविधा विकास निधी, कंत्राटदारांच्या/पुरवठादारांच्या अनामत रकमा इ. दायित्वांचा समावेश असून या सर्व ठेवी आवश्यक आहेत.

-----------------

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या घरफाळा विभागातील गैरव्यवहाराबाबत**

**(१७) * १८४८२ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या घरफाळा विभागात एच.सी.एल कंपनीच्या कर्मचा-यांनी दिनांक १७ मे, २०१५ रोजीच्या सुमारास केलेल्या तपासणीत तब्बल १,२२५ पावत्या झिरो बॅलन्स असल्याचे आढळून आले असल्याने महानगरपालिकेच्या घरफाळा विभागात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कोल्हापूर महानगरपालिकेतील घरफाळा विभागाने गेल्या १२ वर्षात रिवाईज ॲसेसमेंट न केल्यामुळे २० हजाराहून अधिक मिळकतींना घरफाळा लागू झाला नसल्यामुळे महापालिकेचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाला असून डिमांड रजिस्टर अद्ययावत नसल्यामुळे थकबाकीदारांची नांवे सुध्दा महापालिकेकडे उपलब्ध नसल्याची बाब माहे एप्रिल २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कोल्हापूर महानगरपालिका घरफाळा विभागातील कर्मचारी यांनी सन २०१४/१५ या सालात हस्तदेय (Manual) पावतीद्वारे मुळे मालमत्ता कराची रक्कम जमा करुन घेतली आहे. मात्र दंड व्याजाची रक्कम भरुन घेतलेली नाही त्यामुळे सदर पावतीमध्ये दंडाच्या रकान्यात निरंक (झिरो बॅलन्स) असे दिसत आहे.

जमा न झालेली दंडाची व्याजासहित रक्कम सन २०१५/१६ या सालातील मालमत्ता कराच्या बिलामध्ये समाविष्ठ केलेली आहे. ही रक्कम वसुल करणेत येत आहे.

(२) महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचे सन २००३/०४ नंतर मालमत्तेचे पुनर्विलोकन झालेले नाही.

सन २०११/२०१२ पासून शहरातील मिळकतीचे भांडवली मुल्यवर्धीत कर आकारणीमध्ये सुधारणा करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुदीनुसार पाच वर्षानी सन २०१६/१७ मध्ये मालमत्तेचे पुनर्विलोकन करणेचे नियोजन केलेले आहे.

दोन मालमत्ता पुनर्विलोकन कालावधीमधील मिळकती शोधुन त्या मिळकतीना कर आकरणीच्या कक्षेत समाविष्ट केले जाते व अशा मिळकतीकडून पुर्वलक्षी प्रभावाने मालमत्ता कराची वसूली केली जाते.

कर आकारणी विभागाचे संपूर्ण संगणकीकरण करणेत आले असुन त्याद्वारे कर आकारणी पात्र मिळकतीचे डिमांड थकबाकी अद्यावत ठेवणेत येते.

(३) नाही.

(४) नाही.

-----------------

## राज्यातील कारागृहांमध्ये बसविण्यात आलेले मोबाईल जामर निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१८) * २३१४१ श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कारागृहांमध्ये १ कोटी ३७ लाख ५० हजार रुपये खर्च करुन सन २०१४ मध्ये बसविण्यात आलेले २७५ मोबाईल जामर निकृष्ट दर्जाचे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

कारागृह विभागाने राज्य योजना आणि १३ वा वित्त आयोगांतर्गत राज्यातील कारागृहात ३१२ आणि जिल्हाधिकारी यांचे निधीतून २३ असे एकूण ३३५ मोबाईल जामर्स बसविलेले आहेत. व्यवस्थितरित्या कार्यान्वित आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाबाबत**

**(१९) * २२००८ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी संपादित करावयाच्या वन विभागाच्या जागेचा प्रस्ताव भारतीय विमानपतन प्राधिकरणाने (एएआय) करावा की राज्य शासनाने सादर करावयाचा यासंदर्भात निर्माण झालेल्या वादामुळे गत दोन वर्षापासून भूसंपादन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विमानसेवा सुरू होण्याकरिता विमानतळाचे विस्तारीकरणासाठी अतिरिक्त ५.६० हेक्टर जमिनीची मागणी करणारा प्रस्ताव तयार करण्याबाबत टाळाटाळ करण्यामागची कारणे काय आहेत,

(३) तसेच, आधीच धावपट्टीची दुरुस्ती, विमान कंपन्यांचा नकार यामुळे गत चार वर्षापासून कोल्हापूरची विमानसेवा बंद आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणी शासनस्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) अशी वस्तुस्थिती नाही. विमानतळ विस्तारीकरणासाठी आवश्यक १०.९३ हेक्टर वन जमिनीच्या निर्वनिकरणाचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन २०१२ मध्ये सादर केला होता. परंतु सन २०१३ मध्ये विमानतळ विस्तारीकरणाची जबाबदारी भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडे सोपविल्यानंतर या १०.९३ हे. वन जमिनीपैकी ५.६० हेक्टर वन जमिनीची प्रकल्पासाठी आवश्यकता असल्यामुळे भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने निर्वनिकरणाचा सुधारीत प्रस्ताव सादर करण्याचे निश्चित केले होते. प्रकल्प संस्था बदलल्यामुळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सन २०१२ मध्ये सादर

केलेल्या प्रस्तावावर कार्यवाही करता येणे शक्य नसल्याने वन जमिनीच्या निर्वनिकरणाचा प्रस्ताव भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाद्वारे नव्याने सादर करण्यात येत आहे.

(३) विमानतळ धावपट्टीच्या पुर्नबांधणीसाठी दिनांक ३१.१२.२०१० ते दिनांक १०.३.२०११ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी विमानतळाचा वापर बंद करण्यात आला होता. परंतु त्यानंतर दिनांक ११.३.२०११ पासून किंगफिशर एअर लाईन्सची नियमित हवाई सुरु करण्यात आली होती. तथापि, किंगफिशर कंपनी बंद झाल्यामुळे सध्या नियमित हवाई सेवा सुरु नाही. परंतु विमानतळ पूर्णत: कार्यान्वित आहे.

(४) व (५) दिनांक १५.५.२०१५ रोजी अ.मु.स. (विमानचालन) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत वन जमिनीच्या निर्वणीकरणाचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या व विमानतळ विस्तारीकरणांतर्गत धावपट्टीची लांबी १८०० मीटरपर्यंत वाढविण्याच्या सुचना भारतीय विमानपत्तन प्राधिकरणास देण्यात आल्या आहेत.

-----------------

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथील नवनिर्मित नगर-पंचायतचा कार्यभार प्रशासकाकडे असल्याबाबत**

**(२०) * १६९८६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) येथील नवनिर्मित नगर-पंचायतचा कार्यभार प्रशासकाकडे असून प्रशासकाचे दुर्लक्षितपणामुळे २०००० लोकसंख्या असलेल्या गावाची विकास कामे होत नसून सोयीसुविधा मिळत नसल्यामुळे नागरीकांमध्ये तीव्र असंतोष व संतापाची भावना पसरत असल्यामुळे याबाबत शासनाने गांभीर्याने दखल घेऊन ठोस उपाययोजना करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १३ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदरहू निवेदनावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा प्रकारचे निवेदन दिनांक १३/०५/२०१५ रोजी प्राप्त झाले आहे.

(२) मुख्याधिका-यांची रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे १८५ उमेदवारांची मागणीपत्र सादर करण्यात आले आहे.

शासनाने तालुका मुख्यालयाच्या ठिकाणच्या ग्रामपंचायतीचे नगरपरिषद /नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार स्थापित करण्यात आलेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतीकरीता आवश्यक पदनिर्मिती लवकरच करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुर्ला-चुनाभट्टी येथील टाटानगर सहकारी गृहनिर्माण संस्थेची इमारत मोडकळीस आल्याबाबत

**(२१) * २२४४४ श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी):** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुर्ला-चुनाभट्टी येथील टाटानगर सहकारी गृहनिर्माण संस्थेची इमारत अक्षरश: मोडकळीस आली असून ही इमारत कधीही कोसळू शकेल अशी स्थिती असून १२३ कुटूंबे या इमारतीत जीव धोक्यात घालून रहात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी तातडीने चौकशी करुन इमारतीचा तातडीने पुनर्विकास करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(३) अद्यापही यासाठी कोणत्याच उपाययोजना केल्या नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सदर इमारत अतीधोकादायक घोषित करुन महानगरपालिका कायदा कलम ३५४ अन्वये निष्कासन करण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे.

(२) सदर इमारत खाजगी मालकीची व धोकादायक इमारत असल्यामुळे या इमारतीचे पुनर्वसन किंवा पुनर्विकास करणे ही बाब मुंबई महानगरपालिकेच्या अखतयारितील नसल्याचे व सदर इमारत शासकीय समापक, उच्च न्यायालय यांच्या ताब्यात असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील प्रथम मेट्रो रेल्वे प्रकल्प वर्सोवा ते घाटकोपर करीता वापरण्यात आलेल्या मुख्य रस्ता दुरुस्तीबाबत

**(२२) * २०३५९ श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व) : तारांकित प्रश्न क्रमांक १३६७१ ला दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील प्रथम मेट्रो रेल्वे प्रकल्प वर्सोवा ते घाटकोपर असा सुरु करण्याकरिता वापरण्यात आलेला मुंबई महानगरपालिकेचा मुख्य रस्ता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महानगरपालिकेस दुरुस्त करुन हस्तांतरीत करण्याचे काम पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, दुरुस्तीची उर्वरित कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून पूर्ण करण्याचे प्रस्तावित होते. त्यापैकी किती कामे पूर्ण झाली आहेत आणि उर्वरित दुरुस्तीची कामे करण्यास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महानगरपालिकेने रस्ता ताब्यात घेऊन दुरुस्ती व पुनर्बांधणीची कामे करावी व त्याकरिता आवश्यक निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून देण्यात येईल असे प्रस्तावित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेने रस्ता ताब्यात घेतला असल्यास, उर्वरित दुरुस्तीची व पुनर्बांधणीची कामे करण्याबाबत महानगरपालिका प्रशासनाने कोणती उपाययोजना केल्या आहेत,

(४) काही ठिकाणी मुंबई मेट्रो-१ प्रा.लि.यांच्याकडून प्रलंबित कामे करुन घेण्याबाबत त्यांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून आदेश देण्यात आले होते त्याप्रमाणे प्रलंबित दुरुस्तीची कामे पूर्ण झाली आहेत काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) सदर रस्ता मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सुधारणेस्तव मुंबई महानगरपालिकेकडून प्राधिकरणाने ताब्यात घेतला होता. सदर रस्त्याची सुधारणा उपलब्ध जागेत (जागृती नगर मेट्रो स्टेशन भागातील व्हायाडक्टच्या कामाव्यतिरिक्त) पूर्ण करुन मुंबई महानगरपालिकेमार्फत ०७/०५/२०१५ रोजी "आहे त्या स्थितीत" (As is where is basis) वर हस्तांतरीत करुन घेण्यात आलेला आहे. सदर व्हायाडक्टचे काम डिसेंबर २०१५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजीत आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महापालिकेने अंधेरी घाटकोपर लिंक रोड व जे.पी. रोड यांची दुरुस्ती व पुर्नबांधणीसाठी एकूण रु.७८ कोटींची मागणी केली असून प्राधिकरणाने महानगर पालिकेकडून याबाबतच्या सविस्तर अंदाजपत्रकांची मागणी केलेली आहे.
(४) होय, दुरुस्तीची कामे पूर्ण झाली आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धारकल्याण व नाव्हा (ता.जि.जालना) शिवारातील शेतवस्त्यांवर चोरट्यांनी चोऱ्या करुन चार जणांना गंभीर जखमी केल्याबाबत**

**(२३) * २३८०१ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धारकल्याण व नाव्हा (ता.जि.जालना) शिवारातील चार शेतवस्त्यांवर चार सशस्त्रधारी चोरट्यांनी चोऱ्या करून रुपये १ लाख ७१ हजाराचा ऐवज लंपास केल्याचे तसेच केलेल्या मारहाणीत चारजण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक २३ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

नमूद प्रकरणी तालुका जालना पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १३४/२०१५ भा.दं.वि. कलम ३९४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.
(२) दि.२३/०५/२०१५ रोजी २.१० वाजेच्या सुमारास धारकल्याण शिवारात चोरटे आले असून त्यांनी वस्तीवरील लोकांना मारहाण केल्याचे मोबाईल वरुन सांगितल्याने पोलीस पथक तात्काळ तेथे पोहचले मारहाणीत जखमी इसमांना औषधोपचारासाठी जालना येथे इस्पीतळात रवाना केले व आरोपींचा जवळच्या शिवारात शोध घेतला.

दाखल गुन्ह्याच्या तपासात २ संशयीत आरोपींना दि.३०/०५/२०१५ रोजी अटक केली असून त्यांना पोलीस व न्यायालयीन कोठडी घेवून तपास करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत आरोपी जामीनावर आहेत. संशयीत अटक आरोपी यांच्याकडून गुन्ह्यात गेला माल हस्तगत झाला नसून सदरचा गुन्हा तपासावर आहे.
(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**खेरवाडी पोलीस स्टेशनचे (मुंबई) वरिष्ठ निरिक्षक व सहायक निरिक्षक यांच्यावर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केल्याबाबत**

**(२४) * २५०७९ ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१४ मध्ये मुंबई येथे फसवणूक आणि खोटी कागदपत्रे तयार करण्या-या आरोपीस गुन्ह्यात अटक न करण्यासाठी आरोपीकडे खेरवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरिक्षक, श्री. संजय जाधव आणि सहायक निरिक्षक, श्री. दिलीप इंगळे यांनी रुपये ५ लाखाची मागणी केली व तडजोडी अंती ३ लाख रुपये लाच घेण्याचे ठरले व दीड लाख रूपयांचा हप्ता स्वीकारताना त्यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणात ए.सी.बी.ने वरिष्ठ निरिक्षकांच्या घरी घेतलेल्या झडतीत सोन्याची बिस्किटे आणि ९ लाख ८१ हजार रूपयांची रोकड सापडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशीअंती दोषापितांवर कोणती दंडात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यात आली वा प्रस्तावित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी आरोपीस गुन्ह्यास अटक न करण्यासाठी आरोपीकडे खेरवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय जाधव व सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप इंगळे यांनी रुपये ५ लाखाची मागणी करुन तडजोडीअंती रुपये १,००,०००/- स्विकारण्याचे मान्य केल्याने त्यांच्याविरुध्द ॲन्टी करप्शन ब्युरो, बृहन्मुंबई येथे गु.र.क्र.३०/२०१५, लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ चे कलम ७,१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तथापि, त्यांनी लाचेची रक्कम स्वीकारलेली नाही. सदर गुन्ह्यात श्री.संजय नारायण जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक व श्री.दिलीप भगवंत इंगळे, सहायक पोलीस निरीक्षक यांना दि. ३०.०५.२०१५ रोजी अटक करुन मा. न्यायालयात हजर केले असता, मा.न्यायालयाने त्यांची जामीनावर मुक्तता केली आहे.

या प्रकरणी आरोपी लोकसेवक श्री.संजय नारायण जाधव, तत्कालीन वरिष्ठ निरीक्षक यांच्या राहत्या घराच्या घरझडतीमध्ये त्याच्याकडे रोख रुपये ९,८१,५००/- व प्रत्येकी १०० ग्रॅमची ४ सोन्याची बिस्कीटे मिळून आली आहेत. सदर मुद्देमाल तपासकामी जप्त करण्यात आला असून याबाबत चौकशी चालू आहे.

आरोपी लोकसेवक श्री. संजय नारायण जाधव, तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक व दिलीप भगवंत इंगळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना दिनांक ३०.०५.२०१५ पासून शासनसेवेतून निलंबित करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

-----------------

**कर्नाटक एम्टा कोळसा कंपनीच्या धुळीमुळे पिकांचे नुकसान व जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याबाबत**

**(२५) * २४७३३ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती शहरानजीक असलेल्या कर्नाटक एम्टा कंपनीच्या कोळसा वाहतुकीमुळे शेतपिकांचे व जनतेच्या आरोग्यावर होत असलेला विपरीत परिणाम तसेच घरांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याने त्यावर उपाययोजना करण्याकरिता दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास मा. उद्योग मंत्री यांनी मा.ऊर्जा मंत्री यांना तसेच मा.वित्त मंत्री यांना दिनांक २९ जानेवारी २०१५ रोजी जनरल/चंद्रपूर/जा.क्र.१०००/२०१५ अन्वये जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे. तसेच कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) श्री.सुरेश धानोरकर, विधान सभा सदस्य यांनी प्रस्तुत विषयी मा.मंत्री वित्त व वने तथा पालकमंत्री चंद्रपूर यांना दि. २९ जानेवारी, २०१५ रोजी निवेदन दिले असता त्यासंदर्भात जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी निवेदन अग्रेषित करण्यात आले होते.

(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर, अधिक्षक, कृषि अधिकारी, चंद्रपूर व उपविभागीय अधिकारी, वरोरा यांना कार्यवाही करण्यासाठी निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शहापूर (जि.ठाणे) येथून मुंबईला पाणी पुरवठा करणा-या भातसा धरणाची सुरक्षा करणा-या सुरक्षा सक्षकांना वेतन अदा करण्याबाबत**

**(२६) * १९०३१ श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर तालुक्यातील (जि.ठाणे) मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या आणि दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असल्याने संवेदनशील मानल्या जाणाऱ्या भातसा धरणाची सुरक्षा करणाऱ्या सुरक्षा रक्षकांना माहे सप्टेंबर, २०१४ पासून ९ महिन्याचे वेतन देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदर सुरक्षा रक्षकाचे प्रलंबित वेतन तातडीने देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) भातसा धरणाच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे यांच्याकडील एकूण ३३ सुरक्षा रक्षक कार्यरत असून त्यांचे माहे ०९/२०१४ ते ०५/२०१५ पर्यंतचे वेतन निधी अभावी प्रलंबित होते.

त्यापैकी माहे ९/२०१४ ते ४/२०१५ कालावधीचे वेतन माहे मे व जून, २०१५ मध्ये देण्यात आले असून उर्वरित महिन्यांचे वेतन लवकरच अदा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरात मान्सूनपूर्व सर्व्हेक्षणातील सुमारे ५५० अतिधोकादायक इमारतीबाबत**

**(२७) * १६७४९ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील**

**(इस्लामपूर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील खाजगी, महानगरपालिका व म्हाडाच्या उपकर प्राप्त मोडकळीस आलेल्या ५५० इमारती या अतिधोकादायक असल्याने त्या केव्हांही कोसळण्याची शक्यता असल्याचे महानगरपालिकेने केलेल्या सर्व्हेक्षणात माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतीमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एप्रिल २०१५ मध्ये केलेल्या सर्व्हेक्षणामध्ये ७१२ इमारती अतिधोकादायक असल्याचे आढळून आले आहे.

तसेच मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतीच्या मंडळाने केलेल्या सन २०१५ सालच्या मान्सूनपूर्व सर्वेक्षणात १४ उपकर प्राप्त इमारती अतिधोकादायक आढळून आल्या आहेत.

(२) अतिधोकादायक आढळून आलेलया ७१२ इमारतींना बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई मनपा अधिनियम १८८८ च्या कलम ३५४(१) अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

त्यानुसार १५३ इमारती निष्कासित करण्यात आल्या आहेत. १८० इमारतींची विद्युत जोडणी व जलजोडणी खंडीत करण्यात आली आहे. तसेच ३७९ इमारती रिकाम्या करणे व निष्कासन कारवाई करणे याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कायदेशीर कारवाई चालू आहे.

(३) महापालिकेच्या मालकीच्या इमारतीमधील रहिवाशांची सदर इमारत तोडण्यापूर्वी पर्यायी व्यवस्था करण्यात येते. अन्य इमारती खाजगी मालकीचया असल्याने सदर इमारतीमधील रहिवाशांची पर्यायी व्यवस्था इमारत मालकाने/रहिवाशांनी करावयाची आहे.

उपकरप्राप्त अतिधोकादायक भागातील रहिवाशांना संक्रमण शिबिरात हलविण्यात येते व इमारतीच्या दुरुस्तीबाबत/रिकामी करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येते. तसेच रहिवाशांना योग्य ती खबरदारी घेण्याच्या दृष्टीने सूचना देखील वृत्तपत्रांतून प्रसिध्द करण्यात येतात.

पावसाळ्यापूर्वी केलेल्या सर्वेक्षणात आढळून आलेल्या १४ अतिधोकादायक उपकरप्राप्त इमारतींमध्ये २७७ निवासी व २६० अनिवासी असे एकूण ५३७ रहिवाशी/भाडेकरु आहेत.

२७७ निवासी रहिवाशी/भाडेकरु यांना स्थलांतरीत करण्याबाबत म्हाडामार्फत आवश्यक ते प्रयत्न करण्यात येत असून, त्यांना स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालवणी पोलीस ठाण्याच्या लॉकअप मध्ये आरोपीचा मृत्यु झाल्याबाबत

**(२८) * २१५३८ श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालवणी येथे चोरीच्या तपासासाठी ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचा मालवणी पोलीस ठाण्याच्या लॉकअप मध्ये मृत्यू झाल्याची घटना दिनांक २ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी चालु आहे.

-----------------

**मौजे मोडकसागर (वैतरणा) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील परिसरामध्ये मुंबई महानगरपालिकेमार्फत संरक्षण भिंतीचे बांधकाम केल्याबाबत**

**(२९) * २०७१७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मोडकसागर (वैतरणा) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील हिंदुस्थान कॉलनी व नविन इंटक टॉवर परिसरामध्ये मुंबई महानगरपालिकेमार्फत संरक्षण भिंतीचे बांधकाम कंत्राटदार श्री.तळेकर व श्री.शिंदे यांनी स्थानिक अधिका-यांशी संगनमत करुन खराब साहित्य वापरुन निकृष्ट दर्जाचे काम केल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जल अभियंता (प्रचालने) कापुरबावडी यांच्याकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपजल अभियंता (प्रचालने) कापुरबावडी यांनी कोणतीही चौकशी न करता कंत्राटदाराशी आर्थिक व्यवहार करुन महानगरपालिकेच्या करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संरक्षण भिंतीचे निकृष्ट काम करणा-या कंत्राटदारांविरुध्द व शासनाच्या करोडो रुपयांचे नुकसान करणा-या अधिका-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) याबाबतची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली होती हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने मोडकसागर येथे नवीन इंटेक टॉवर परिसरामध्ये दगडी संरक्षक भिंत बांधण्याचे दिलेले काम कंत्राटदारामार्फत करण्यात आले आहे.

सदर कामासाठी महानगरपालिकेच्या नियमावलीनुसार चांगल्या प्रतीचे आणि दर्जाचे बांधकाम साहित्य वापरण्यात आले असून, सदर बांधकाम साहित्याची महानगरपालिकेच्या प्रयोगशाळेत वेळोवेळी चाचणी करण्यात आली आहे. तसेच या

कामाच्या दर्जाबाबतची पाहणी महानगरपालिकेच्या दक्षता अधिकाऱ्यांमार्फत झाली आहे.

सदर कामाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदर कामाची अंतर्गत चौकशी व पाहणी केली असता तक्रारीबाबत तथ्य आढळून आले नाही. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यांना पिण्याचे पाणी मिळण्याबाबत

**(३०) * २००७७ श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यात महानगरपालिकेने २० कोटी रुपये खर्च करुन नळजोडणी आणली, मात्र या नळजोडणीला पाणी नसल्यामुळे महानगरपालिकेच्या पाण्याविना आदिवासी महिलांना बोअरवेल, विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीत २७ आदिवासी पाडे असून जवळपास ४००० ची लोकवस्ती वर्षानुवर्षे राहत असलेल्या या आदिवासी पाड्यामध्ये आजही नागरी सुविधांचा अभाव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी नुसार सदर आदिवासी पाड्याच्या पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी महानगरपालिकेने २० कोटी रुपये खर्च करुन केलेल्या नळजोडणीस पाणी न येण्याची कारणे काय आहेत तसेच यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) आदिवासी पाड्याच्या पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेसाठी शासन कोणत्या ठोस उपाययोजना करीत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) आरे वसाहतीतील आदिवासी पाड्यांत नागरी सुविधांचा अभाव आहे हे अंशतः खरे आहे.

(३) आरे वसाहतीमधील २७ आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेमध्ये एकूण १४ प्रस्ताव मंजूर झाले होते.

त्यापैकी ११ ठिकाणी काम पूर्ण झाले असून या ११ ठिकाणांमध्ये एकूण २२ आदिवासी पाडे समाविष्ट आहेत. सदर २२ आदिवासी पाड्यांपैकी १८ आदिवासी पाड्यांना जलजोडण्या देऊन पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

उर्वरित ४ ठिकाणी आदिवासी पाड्यामधून यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे अद्यापि पाणी पुरवठा सुरु करता आलेला नाही.

उरलेल्या ३ प्रस्तावांपैकी २ ठिकाणी चित्रनगरी व १ ठिकाणी फोर्स वन यांचे ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे ५ आदिवासी पाड्याना पाणीपुरवठा होऊ शकलेला नाही.

(४) आरे वसाहतीतील १८ आदिवासी पाड्यांना जलजोडण्या देऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

४ आदिवासी पाड्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे अद्यापि पाणी पुरवठा सुरु करता आलेला नाही.

५ आदिवासी पाड्यांसाठी चित्रनगरी व फोर्स वन यांचे ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्यामुळे सदर ठिकाणच्या पाड्यांना पाणी पुरवठा करता आलेला नाही.

-----------------

## खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) अ‍ॅडलॅब इमॅजिका पार्कमध्ये झालेले अपघात

**(३१) * २०९५५ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) अ‍ॅडलॅब इमॅजिका पार्कमध्ये रायडिंग ट्रॉलीची ट्रॅक तुटल्याने माहे फेब्रुवारी २०१४ मध्ये अपघात झाल्याप्रकरणी करण्यात आलेल्या गुन्हे अन्वेषनाच्या तपासात कोणासही दोषी न धरल्याबाबत मा.न्यायालयाने नाराजी व्यक्त केल्याचे माहे मार्च २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरहू वॉटर पार्कमध्ये मुंबईतील मरोळ येथील जैनाब या चार वर्षीय बालिकेचा माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात बुडून मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू अपघातांचा तपास करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, तपासात काय आढळून आले व तदनुसार सदर अपघातास जबाबदार असणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच अपघातातील जखमींना व मृत बालिकेच्या कुटूंबियांना आर्थिक मदत मिळावी म्हणून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) खालापूर पोलीस स्टेशन येथे प्रथम कंपनी अपघात रजिस्टर १/२०१४ अन्वये दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१४ रोजी २१.४५ वा. दाखल करण्यात आला होता.

सदर अपघाताच्या पुढील चौकशीवरुन खालापूर पोलीस स्टेशन येथे का.गु.र.क्र.३४/२०१४, भा.दं.वि. कलम २८७, ३३७, ३३८ अन्वये दिनांक ७ मार्च, २०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यामध्ये अपघातग्रस्त कोस्टल राईडमधील व्हील ॲसेंब्लीमधील तुटलेला एक्सल रॉड हा तांत्रिक अभिप्रायाकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविण्यात आला होता.

सदरचा तुटलेला एक्सल रॉड परिक्षणाकरिता मेटलर्जी इंजिनियरींग आय.आय.टी. पवई, मुंबई येथे पाठविण्यात आला होता. त्यांनी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने तज्ञांचे अभिप्राय, सर्व तांत्रिक बाबींचा विचार करुन व अहवाल विचारात घेवून आरोपींवर दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) होय.

(३) तपासामध्ये असे आढळून आले आहे की, सौ.तसलीम मोईस बकसामुसा यांची मुलगी कु.झेनाब हिच्यासह वॉटर पार्कमधील वेव्ह पुल या वॉटर राईडमध्ये पाण्यात खेळत असताना अचानक तिचा पाय सटकल्याने ती पाण्यात पडून बुडाली. तिला त्वरीत बाहेर काढून वॉटर पार्कमधील मेडीकल सेंटरमध्ये प्राथमिक उपचार करुन तिला खोपोली येथील हॉस्पीटलमध्ये नेले असता ती मृत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या प्रकरणी, मयत मुलगी कु.झेनाब हिच्या आईवडीलांनी सदर घटना ही अपघात स्वरुपाची असल्याने कोणाविरुध्दही तक्रार नसल्याचा लेखी जबाब दिला आहे.

या प्रकरणी, खालापूर पोलीस ठाणे येथे अ.मृ.र.न२३/२०१५, सी.आर.पी.सी.१७४ अन्वये अकस्मात मृत्यू दाखल करण्यात आला असून प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबीत आहे.

(४) अपघातातील जखमींना व मृत बालिकेच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत पोलीस विभागाचा संबंध येत नाही. तथापि, इन्शुरन्स क्लेम करण्याकरिता पोलीस ठाणेकडून लागणाऱ्या कागदपत्रांची पुर्तता करण्यात येत असते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवीन नांदेड प्रशासनाच्यावतीने भूखंड धारकांसह सिडकोच्या योजनेबाबत**

**(३२) * १७०९० श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील सिडको नवीन नांदेड प्रशासनाच्यावतीने भूखंड धारकांसह सिडकोच्या एक ते चार योजनेतील अनेक घरधारकांनी महानगरपालिकेत विलीनिकरणानंतर तब्बल १० वर्षांनी सेवाकर, पाणी पुरवठा, मासिक कर्ज हप्ता घरधारकांच्या रकमेपोटी नोटीसा बजावल्याने घरमालक व भूखंडधारकांत तीव्र नाराजी पसरली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, घरमालक व भूखंडधारकांना सदरील रकमा मूळ रकमेच्या पाच पट दंडासहित लावण्यात आल्याने प्रचंड असंतोष पसरला असुन या संदर्भात आंदोलन करणार असल्याने शासन त्वरीत याबाबत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही. परंतु नविन नांदेड प्रकल्पाचा सिडकोद्‌वारे विकास झाल्यानंतर सदर प्रकल्पाचे हस्तांतरण नांदेड वाघाळा महानगरपालिकेकडे करण्यात आले. हस्तांतरणापूर्वी नागरीकांसाठी देण्यात येणाऱ्या सार्वजनिक दिवाबत्ती, पाणी पुरवठा व इतर सेवा-सुविधांपोटी सिडकोकडून कर आकारला जात होता. सिडकोकडून आकारल्या गेलेल्या करांचा वेळेवर भरणा न केल्यास विलंबशुल्काने आकारणी करण्यात येते. सन २००५ मध्ये म्हणजे हस्तांतरणापूर्वी संबंधित थकबाकीदाराने करांचा भरणा करणे आवश्यक होते. परंतु, ज्या थकबाकीदारानी करांची रक्कम सिडकोला जमा केलेली नाही त्यांना नोटीसा बजावण्यात आली आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची रिंगटोन वाजविल्याने तरुणाची हत्या झाल्याबाबत**

**(३३) * २०८०५ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी (जि. अहमदनगर) येथील सागर सुभाष शेजवळ या विद्यार्थ्याच्या मोबाईलवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील गाण्याची रिंगटोन वाजल्याच्या कारणावरुन तडीपार गुंड विशाल कोते व त्यांच्या साथीदारांनी सदर विद्यार्थ्याचे अपहरण करुन, दगडाने ठेचून व अंगावर गाडी घालून निर्घृणपणे हत्या केल्याचे दिनांक १६ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त हत्येप्रकरणी चौकशी करण्यात आलेली आहे काय व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय

सदर प्रकरणी शिर्डी पोलीस स्टेशन गुरनं.१०३/२०१५ भा.दं.वि.क.३०२, ३६३, ३६६, ३९५, २०१, १४३, १४८, १०९ सह अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा कलम ३(२)(५) व कलम ३(१)(१०) प्रमाणे दि.१६.५.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, गुन्हा तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**औरंगाबाद शहरात वाहने जाळण्याचे प्रकार सुरु असल्याबाबत**

**(३४) * १९९६२ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील जय भवानी नगरमधील वाळुंज परिसरात १० दुचाकीसह एक चार चाकी वाहन जाळण्यात आल्याचे दिनांक १६ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरात गत काही महिन्यापासून वाहने जाळण्याचे प्रकार वांरवार सुरु असून शहरातील बजाजनगर भागात तीन दिवसांत १८ वाहने जाळण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासर्व प्रकाराचा तपास करण्यात आला आहे काय, तपासात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

औरंगाबाद शहरातील जय भवानी नगर व मुकुंदवाडी परिसर दि. १६ मे, २०१५ रोजी ८ दुचाकी मोटारसायकल जाळल्याबाबत गु.र.नं.३०९/१५ भा.दं.वि. ४३५, दि.१४/०५/१५ रोजी १ मोटार सायकल जाळल्याबाबत गु.र.नं.३०१/१५ भा.दं.वि.४३५ व ३४, दि.२२/०५/१५ रोजी १ मोटार सायकल जाळल्याबाबत गु.र.नं. १७५/१५ भा.दं.वि.४३५, दि.२१/०४/१५ रोजी १ रिक्षा, १ मोटार सायकल व इंडिका कार जाळल्याबाबत गु.र.नं. १८७/१५ भा.दं.वि.४३५ व ४२७ याप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.
(२) पोलीस स्टेशन एमआयडीसी वाळुंज हद्दीत बजाजनगर भागात जानेवारी-१५ ते मे-१५ अखेर ४१ दुचाकी व चारचाकी वाहने जाळल्याबाबत गु.र.नं. ४, ६, १५, ४१, ४२, ४४, ४९, ५२, ६३, ८०, १०३, २०० भा.दं.वि. ४३५ प्रमाणे तसेच गु.र.नं. ९५/१५ भा.दं.वि. ३८०, ४३५, ४११ व ३४ प्रमाणे गु.र.नं. १२१/१५ भा.द.वि. ४३५, ३४ प्रमाणे असे एकूण १४ गुन्हे दाखल आहेत.
(३) गु.र.नं. ४९/१५ मध्ये १, गु.र.नं. ९५/१५ मध्ये १ व गु.र.नं. १२१/१५ मध्ये १ असे ३ आरोपीस अटक करण्यात आली असून सदर आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोप सादर करण्यात आले आहे. उर्वरीत गुन्ह्यांचा तपास चालू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**मुंबईतील काळबादेवी येथील गोकुळ निवास इमारतीचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३५) * १७५२३ श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल),**

**श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळबादेवी येथील गोकुळ निवास इमारतीला दिनांक ९ मे, २०१५ रोजी लागलेल्या भीषण आगीमध्ये सदरची इमारत कोसळून अग्निशमन दलातील तीन अधिकाऱ्यांच्या मृत्यू व सहा जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतींचे ऑडीट व फायर ऑडीट न करणे, गतकाळात अग्निकांडाचे प्रसंगी अग्निशमन दलाच्या जवानांच्या झालेल्या मृत्यूच्या कारणांचा शोध घेऊन उपाययोजना न करणे, अग्निशमन दलातील जवानांना पुरविण्यात येणा-या आग प्रतिबंधक गणवेश, हातमोजे, बुट, मास्क यांच्या दर्जाची कसून तपासणी न करणे, अग्निरोधक गणवेश व साधनसामुग्रीच्या वापर विषयक परिक्षणाचा अभाव इत्यादी गंभीर बाबींच्या निष्काळजीपणास जबाबदार असलेल्या महानगरपालिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर इमारतीला लागलेल्या आगीमध्ये मृत झालेल्या कुटुंबियाचा व इमारतीमध्ये राहणा-या कुटुंबियांच्या पुनर्वसनाबाबत तसेच जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर दुर्घटनेमध्ये अग्निशमन दलाच्या ४ वरिष्ठ अधिकाऱ्यांचा मृत्यु झाला तसेच ५ अग्निशमन दलाचे कर्मचारी व ६ व्यक्ती जखमी झाल्या होत्या.

(२) मुंबईतील काळबादेवी येथील गोकुळ निवास ही इमारत उपकर प्राप्त खाजगी इमारत आहे आणि महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंतर्गत प्रत्येक इमारतीचे फायर ऑडीट करुन घेण्याची जबाबदारी इमारतीचे मालक/भोगवटादार किंवा संस्था यांची असते.

त्याचप्रमाणे अग्निशमन दलातील ७७ अधिकाऱ्यांची नामनिर्देशित अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली असून त्यांच्यामार्फत इमारतींची नियमित तपासणी करण्यात येत आहे व सदर कायद्याच्या तरतुदीनुसार ज्या इमारतींमध्ये त्रुटी आढळल्यास इमारत मालक/भोगवटादार यांना नोटीस बजावून सदर त्रुटींची पूर्तता करण्यात येत आहे. व जे त्रुटींची पूर्तता ठरलेल्या वेळेत करीत नाहीत त्यांच्यावर सदर कायद्याच्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रत्येक आगीच्या दुर्घटनेनंतर त्या घटनेची अग्निशमन दलातर्फे चौकशी करण्यात येते व त्याप्रमाणे योग्य ती उपाययोजना वेळोवेळी अंमलात आणण्यात येते.

अग्निशमनाच्या वेळी अधिकारी व कर्मचारी यांना सुरक्षिततेच्या दृष्टीने सन २०१० मध्ये पी.पी.ई. संच देण्यात आले होते. सदर संचाच्या दर्जाची तपासणी शासन मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमध्ये करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे अग्निशमन दलातील सर्व अधिकारी कर्मचारी यांना सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये नवीन पी.पी.ई. संच लवकरच देण्यात येणार आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता, महानगरपालिकेच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांविरुध्द कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही.

(३) सदर इमारतीला लागलेल्या आगीची सखोल चौकशी अति. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीमार्फत करण्यात आली होती. त्याचप्रमाणे या आगीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना मनपाच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे रोख रक्कम देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे त्यांच्या कुटूंबातील प्रत्येकी एका व्यक्तीला महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्यात येते. सदर घटनेत मृत पावलेल्या दोन अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना महानगरपालिकेमध्ये नोकरी देण्यात आली असून, उर्वरित २ अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांच्या वैयक्तिक अडचणींमुळे सद्यपरिस्थितीत त्यांना महानगरपालिकेच्या सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही. तथापि, योग्य वेळी त्यांच्या कुटूंबियांच्या मागणीप्रमाणे महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यात येईल.

सदर इमारतीत राहणाऱ्या कुटुंबियांना म्हाडाने प्रभादेवी येथे संक्रमण शिबीरांचे गाळे वितरीत करुन त्यांच्या तात्पुरत्या निवासाची सोय केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील कुळगांव बदलापूर नगरपालिका हद्दीतील मांजर्ली येथील मोहन ग्रीन वुड या इमारतीला पर्यावरण विभागाची परवानगी नसल्याबाबत

**(३६) * १९३०९ श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगांव बदलापूर नगरपालिका हद्दीतील मांजर्ली येथील मोहन ग्रीन वुड या इमारतीला पर्यावरण विभागाची परवानगी नसताना नगरपालिकेने इमारत बांधकाम परवाना दिला असून सदर इमारत नगरपालिकेच्या प्लॅन प्रमाणे न बांधता पार्किंगच्या जागेवर कमर्शियल गाळे काढून विकले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पर्यावरण विभागाची परवानगी नसताना बेकायदेशिरपणे बांधकाम परवानगी देणा-या नगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांवर व प्लॅनप्रमाणे बांधकाम न करणाऱ्या विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, दिरंगाईची कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

कुळगाव बदलापूर नगरपालिकेने पर्यावरण विभागाचा ना-हरकत दाखला घेण्याच्या अटीवर, विकासक मे.एम-२ रिअल्टर्स लॅबिलिटी यांना सुधारीत बांधकाम परवानगी दिनांक २१.२.२०१३ अन्वये दिली आहे.

तथापि, संबंधित विकासकाने पर्यावरण विभागाचा दाखला न घेता १३ इमारती व १ बंगला असे बांधकाम केले आहे. तसेच दोन इमारतीच्या (५ विंग) तळघरामध्ये अनधिकृत व्यापारी गाळ्याचे बांधकाम केल्याचे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) व (३) विषयाधिन इमारत बांधकामाबाबत सदर विकासकास नकाशाप्रमाणे बांधकाम केले नसल्याच्या कारणास्तव दिनांक १९.१०.२०१३ अन्वये नोटीस देण्यात आली. तथापि, याबाबत पुढील कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

दिनांक २७.११.२०१४ मध्ये भोगवटा दाखला मिळण्यास्तव विकासकाने केलेल्या विनंती अर्जाची छाननी करतेवेळी पर्यावरण विभागाच्या परवानगीशिवाय बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यावरुन, विकासकास दिनांक १३.१.२०१५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली.

याशिवाय दिनांक ६.५.२०१५ च्या तपासणीमध्ये दोन इमारतीमध्ये पार्किंगच्या जागेवर गाळ्याचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्यावरुन दिनांक ८.५.२०१५ रोजी सदर अनधिकृत गाळे काढून टाकण्याबाबत विकासकास नोटीस देण्यात आली.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता अनधिकृत बांधकामाबाबत नोटीस दिल्यानंतर कार्यवाही न होणे, पर्यावरणविषयक बाबींच्या उल्लंघनाबाबत कार्यवाही न करणे, महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ कायद्यातील तरतुदीनुसार नोटीस न देणे या अनियमितता विचारात घेता सदर प्रकरणी सविस्तर चौकशी करुन अहवाल देण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना सूचना देण्यात आल्या आहेत. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने प्रसिध्द केलेल्या आकडेवारीमध्ये महिलांचा क्षयरोगामुळे होत असलेल्या मृत्यूबाबत**

**(३७) * १७०३२ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री. विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१०-११ या वर्षी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार २२२ गर्भवती महिलांचा क्षयरोगामुळे मृत्यू झाला होता, तथापि या आकड्यात गेल्या दोन-तीन वर्षात प्रचंड वाढ झाली असून सन २०१४-२०१५ या वर्षात मुंबईतील विविध रुग्णालयात एकूण ३१९ गर्भवती महिलांचा क्षयरोगामुळे मृत्यु झाल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्षयरोग झालेल्या गर्भवती महिलांना कोणत्या बाबीचा त्रास झाल्यास काही रुग्णालयात त्यांची तपासणी सुध्दा करण्यात येत नाही, इतके नव्हे तर एखाद्या क्षयरोगाने ग्रस्त असलेल्या गर्भवती महिलेस दाताचे दुखणे असले तरी डॉक्टर त्यांच्यावर उपचार करीत नसल्याने परिणामी त्यांचा मृत्यु होतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार क्षयरोगग्रस्त गर्भवती मातांचे मृत्यु रोखण्याच्या दृष्टीने आणि क्षयरोगाच्या वाढत्या प्रमाणाला आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. सन २०१४-१५ मध्ये ३८ गर्भवती महिलांचा क्षयरोगामुळे मृत्यू झाला आहे.

(२) हे खरे नाही. गर्भवती महिलांची प्रसुतीपूर्व चिकित्साकेंद्रात नियमित तपासणी केली जाते व आवश्यकतेनुसार औषधोपचार करण्यात येतात.

सदरहू गभर्वती स्त्रियांमध्ये क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास त्यांना सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत केंद्रात उपचार केले जातात.

याव्यतिरिक्त आणखी काही त्रास झाल्यास त्यांना वैद्यकीय सल्ला व पुढील उपचारासाठी वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय येथे संदर्भित केले जाते.

(३) क्षयरोगग्रस्त गर्भवती महिलांचे मृत्यू रोखण्याच्या दृष्टीने व क्षयरोगाच्या वाढत्या प्रमाणाला आळा घालण्याच्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

- प्रत्येक गर्भवती महिलेमध्ये क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास त्या महिलेची थुंकी तपासणी तसेच ICTC केंद्रामध्ये HIV चाचणी करण्यात येते.
- रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्याकरिता आवश्यक आहाराची माहिती देण्यात येते समुपदेशन करण्यात येते.
- चाचणी केल्यानंतर क्षयरोगाचे निदान झाल्यास तात्काळ औषधोपचार सुरु करण्यात येतो.
- तसेच वेळोवेळी औषधोपचाराचा पाठपुरावा करण्यात येतो.
- क्षयरोगाबाबत व्यापक जनजागृती मोहिम राबविली जाते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झाल्याबाबत**

**(३८) * १६४५४ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती अत्यंत बिकट झालेली असून सुमारे ४० कोटी पर्यंत देणे आहे, उत्पन्नापेक्षा खर्च अधिक अशी परिस्थिती निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने राज्यातील अशा बिकट आर्थिक परिस्थितीला सामना करावे लागणाऱ्या महानगरपालिकांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी काही तज्ञ मंडळीची नियुक्ती केली आहे काय वा धुळे महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे काय,
(३) असल्यास, त्याचा तपशील काय,
(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) व (३) बिकट आर्थिक परिस्थितीचा सामना कराव्या लागणा-या महानगरपालिकांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी तज्ञ मंडळीची नियुक्ती केलेली नाही.

तथापि दिनांक ०१.१२.२०१४ पासून रिक्त असलेल्या आयुक्त, धुळे महानगरपालिका या पदावर दि.१३.४.२०१५ च्या आदेशान्वये आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच धुळे महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढीकरीता मालमत्ता करवाढ, जुन्या इमारतीच्या वापरात झालेल्या बदलानुसार मालमत्ता कर आकारणे, बेकायदेशीर नळ जोडणीसाठी दंडात्मक कारवाई करणे, व्यावसायकांची लेखा तपासणी करणे, अनधिकृत बांधकामासाठी दंडात्मक कारवाई करणे अशा उपाययोजना महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिंवडी (जि.ठाणे) तालुक्यातील ५२ गावांचा समावेश एम.एम.आर.डी.ए. मध्ये केल्याबाबत

**(३९) * २४३६६ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिंवडी (जि.ठाणे) तालुक्यातील ५२ गावांचा समावेश एम.एम.आर.डी.ए. मध्ये केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या क्षेत्राचा विकास आराखडा बनविण्यास संबंधित अधिका-यांकडून दिरंगाई केली जात असुन त्यामुळे स्थानिक भूमीपुत्र रहिवाशांना आपल्या जुन्या घरांचा विकास करण्यास बाधा निर्माण झाल्याची बाब दिनांक १८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोदामांच्या सुरु असलेल्या अवैध बांधकामावर कारवाई करण्यास संबंधित अधिका-यांकडून दिरंगाई केली जात असल्यामुळे ग्रामीण भागात अवैध गोदामांचे जाळे पसरलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) भिवंडी तालुक्यातील ५१ गावांच्या (सुधारित ६० गांवे) भिवंडी परिसर अधिसुचित क्षेत्रासाठी दि. १७/३/२००७ च्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.
(२) सदर ५१ गावांची (सुधारित ६० गांवे) प्रारुप विकास योजना शासनाने अनिधियमाच्या कलम ३१ अन्वये विहीत वाढीव मुदतीत दि. ११/३/२०१५ च्या अधिसुचनेद्वारे मंजूर केली आहे. सदरहू मंजूर विकास योजना व विकास नियंत्रण नियमावलीनुसार या अधिसुचित क्षेत्रात विकास अनुज्ञेय आहे.
(३) नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पनवेल (जि.रायगड) सिडको हद्दीतील इमारतींवर मोबाईल टॉवर्स उभारण्यात येत असल्याबाबत

**(४०) * २१३४१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) सिडको हद्दीतील इमारतींवर उभारण्यात आलेले मोबाईल टॉवर्स हटविण्याची मागणी अनेक सोसायटींच्या तक्रारींवरुन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास व्यवस्थापकीय संचालक, सिडको लि., यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोबाईल टॉवर्स मधून निघणा-या विद्युत चुंबकीय लहरींमुळे मनुष्य, प्राणी तसेच नैसर्गिक संतुलनावर दुष्परिणाम होतो हे विविध चाचण्यांमधून सिध्द झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मानवी जीवनावर व नैसर्गिक संतुलनावर दुष्परिणाम करणारे मोबाईल टॉवर्स हटविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचे स्वरुप काय,
(४) नसल्यास, यासंदर्भात शासन निश्चित धोरण ठरविणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पनवेल मधून निवेदने उपलब्ध झालेली नाहीत तथापि, खांदा कॉलनी, खारघर व वाशी इत्यादी सिडको हद्दीतील ठिकाणांकरीता निवेदन प्राप्त झाली आहेत.

(२), (३) व (४) उपलब्ध माहिती नुसार, मोबाईल टॉवर्समधून निर्माण होणाऱ्या विद्युत चुंबकिय लहरी आयोनायजिंग नसल्याने मनुष्य, प्राणी तसेच नैसर्गिक संतुलनावर परिणात होत असल्याचे सिध्द होत नाही. तथापि, दूरसंचार सुविधांच्या जाळ्यासाठी उपकरणांची व बेस स्टेशनची उभारणी याबाबत दूरसंचार विभागाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे दि. ४.३.२०१४ च्या अधिसूचनेनुसार धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणानुसार इलेक्ट्रो-मॅग्नेटिक फिल्ड, रॅडीएशन नॉर्म्स (ई.एम.एफ) संदर्भात मोबाईल टॉवर उभारण्यापूर्वी दुरसंचार विभागाची पूर्व मान्यता घेणे बंधनकारक आहे.

-----------------

**राज्यातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची सव्वा लाख पदे रिक्त असल्याबाबत**

**(४१) * १६५३१ कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के. पाडवी (अक्कलकुवा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जनतेला निश्चित कालावधीत शासनाच्या सेवा मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश (२०१५) काढण्याचा निर्णय दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील अध्यादेशानुसार पहिल्या टप्प्यात साधारण १६० सेवा उपलब्ध करुन देणार असून या सेवा देण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची अंदाजे सव्वा लाख पदे रिक्त असून मे महिन्याच्या शेवटी सुमारे १५ हजार कर्मचारी निवृत्त होत असल्याने सदरहू कायद्याची अमंलबजावणी होण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू कायद्याची अमंलबजावणी होण्यासाठी तसेच रिक्त पदे भरण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) होय,
महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ मधील कलम १० व १२ मध्ये लोकसेवा देण्यात कसूर करणा-या पदनिर्देशित अधिका-यांवर कारवाई करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.
(३) व (४) शासकीय कार्यालयात एकूण मंजूर पदांपैकी सुमारे १८ टक्के पदे रिक्त आहेत. तथापि महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ च्या अंमलबजावणी करीता माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने लोकसेवा ऑनलाईन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, त्यामुळे अंमलबजावणीवर विपरित परिणाम होणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिका वरळी येथील लव्हग्रोव्ह पंपीग स्टेशनबाबत

**(४२) * २४१८४ श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका वरळी येथील लव्हग्रोव्ह पंपीग स्टेशनचे ८९ कोटी ६३ लाख रुपयांचे कंत्राट युनिट कन्सोर्शिअम या कंत्राटदाराला माहे नोव्हेंबर, २०१० मध्ये वा त्या सुमारास देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदाराला प्रशासकीय आराखडा मंजुर झाल्यानंतर कंत्राटदाराने खोदकाम सुरु केले असता त्यास ५७ कोटी ३७ लाख रुपये अदा करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरचे काम नंतर पुर्ण होणे अशक्य असल्याचे मुंबई महानगरपालिकेमार्फत सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी झालेल्या नुकसानास जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वरळी येथील लव्हग्रोह पर्जन्य जल उदंचन केंद्राच्या कामासाठी रु.८९,६३,१५,६८४/- चे कार्यादेश मे. युनिटी एम.ॲण्ड पी.- डब्ल्यू.पी.के. कन्सोर्शिअम या कंत्राटदाराला दिनांक २१.११.२००७ रोजी देण्यात आले होते. परंतु तांत्रिक कारणास्तव प्रकल्पाची जागा बदलावी लागली व तद्नंतर दिनांक १३.०४.२०११ रोजी नवीन जागा उपलब्ध करुन देण्यात आली व कंत्राटात फेरफार करुन रु.११६,८५,३०,००/- (सात वर्षे प्रचालन व परिरक्षण कालावधीसह) एवढ्या किंमतीत नवीन कार्यादेश देण्यात आले आहेत.
(२) सदर कामाच्या प्रशासकीय इमारतीचे पाइल फाऊंडेशनचे काम करण्यात आले. त्याकरिता कंत्राटदारास रु.५७,२९,८७४/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही. सदर काम पूर्ण झाले असून, सदर प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा दिनांक १७ जून, २०१५ रोजी संपन्न झाला.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### पुण्यातील मेट्रोच्या दुस-या टप्प्याला मंजूरी देण्याबाबत

**(४३) * १९६५० डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) : तारांकित प्रश्न क्रमांक ८२४४ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील मेट्रो रेल्वेचा मुळ प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) पुण्यातील मेट्रोच्या पहिल्या टप्प्याच्या मंजूरीनंतर दुस-या टप्प्याला मंजूरी देण्याबाबत दोन महिन्याचा विलंब झाल्यामुळे मेट्रोचा खर्च ६० कोटी रुपयांनी वाढला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) पुणे मेट्रो प्रकल्पास केंद्र शासनाची मान्यता मिळविण्यासाठी राज्य शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत, सदर मंजूरी केव्हा देण्यात येणार आहे व मेट्रोचे काम प्रत्यक्षात केव्हा सुरु होणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२) पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प प्रस्ताव हा ऑगस्ट २०१४ चे दराप्रमाणे केंद्रशासनास सादर करण्यात आला आहे. आताचे दराप्रमाणे प्रकल्पीय रक्कमेत वाढ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.
(३) पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या टप्पा क्र.१ मधील मार्गिका क्र.१ पिंपरी चिंचवड ते स्वारगेट व मार्गिका क्र.२ वनाज ते रामवाडी या दोन्ही मार्गिकांचा एकत्रित प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आला असून त्यास अनुसरुन केंद्र शासनाने दि.११/०२/२०१४ चे पत्रान्वये तत्वत: मान्यता दिली आहे. केंद्र शासनाची अंतिम मंजूरी प्राप्त झाल्यानंतर पुणे मेट्रो रेल प्रकल्पाचे काम सुरु होणे अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपुर शहरामध्ये पाणीपुरवठा करण्यास ओसीडब्ल्यू कंपनीशी करार केल्याबाबत**

**(४४) * २११५३ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपुर शहरामध्ये पाणीपुरवठा करण्यास ओसीडब्ल्यू कंपनीशी करार केल्याने महानगरपालिकेला २६ कोटी रुपयाचा तोटा झाल्याचा ठपका महालेखापरिक्षकांने केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपुर महानगरपालिकेने ओसीडब्ल्युला सन २०१२-१३ मध्ये १४ कोटी २३ लक्ष रुपये सन २०१३-१४ मध्ये १२ कोटी १ लक्ष रुपये अतिरिक्त दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपुर महानगरपालिकेने पाणीपुरवठयाचे कंत्राट दिले होते ते उद्दिष्टे पूर्ण केले आहे काय, महानगरपालिकेने ओसीडब्ल्युला २६ कोटी अतिरिक्त देण्यात आले त्यासंबंधाने चौकशी केली आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) नागपूर महानगरपालिकेने ऑरेंज सिटी वॉटर प्रायव्हेट लि. (ओ.सी.डब्ल्यू) या कंपनीबरोबर केलेल्या कराराबाबत महालेखापाल नागपूर यांनी लेखा आक्षेप उपस्थित केला आहे.

या लेखा आक्षेपाचे निराकरण करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

नागपूर महानगरपालिकेने ऑरेंज सिटी वॉटर प्रायव्हेट लि. (ओ.सी.डब्ल्यू) या कंपनीबरोबर केलेल्या करारनाम्यानुसार प्रमुख उद्दीष्टपूर्तीच्या कामांची आजची सद्यस्थिती खालीलप्रमाणे असून, सदरची कामे प्रगती पथावर आहेत.

| **अ.क्र.** | **उद्दीष्ट** | | **पूर्ण झालेली कामे** | **पूर्ण झालेल्या कामाची टक्केवारी** |
|---|---|---|---|---|
| १ | जुन्या जलवाहिन्या बदलविणे | ५७४.०० कि.मी. | ४५१.९१ कि.मी. | ७८.७३% |
| २ | घरोघरी नळ जोडणी | ३,२०,२११ | ८३,२६९ | २६.००% |
| ३ | इलेक्ट्रॉनिक फ्लो मीटर बसविणे | ८२ | ५४ | ६५.८५% |

-----------------

## मुंबईतील मालाड पश्चिमेकडील ऑक्सा बीचवर बुडून मृत्यू होण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(४५) * २३४९६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड पश्चिमेकडील ऑक्सा बीचवरील बुडण्याचे प्रमाणात वाढ झाली असून सन १९९९ पासून आजपर्यंत ८० जणांचा बुडून मृत्यू झाला असल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने मुंबईतील गिरगाव, दादर, जुहू, वर्सोवा ऑक्सा आणि गोराई किना-याच्या सुरक्षेकरीता रुपये ३.५ कोटींची साधने विकत घेवूनही अद्यापपर्यंत ही साधने वापरण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील किना-यावर बीचवरील बुडण्यापासून सुरक्षेकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे. मालाड पश्चिमेकडील आक्सा बीचवर सन १९९९ पासून आजपर्यंत ८२ जणांचा बुडून मृत्यू झाला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) मुंबई अग्निशमन दलातर्फे गिरगांव, दादर, जुहू, वर्सोवा, आक्सा आणि गोराई येथील समुद्र किना-यावरील लोकांच्या सुरक्षिततेकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- उपरोक्त संदर्भित समुद्रकिना-यावर ११ कायमस्वरुपी व २३ ठेका पध्दतीने असलेले जीवरक्षक तैनात केले जातात.
- मान्सून कालावधीत आपत्कालिन आराखड्यानुसार ४.५ मीटरपेक्षा अधिक भरती दिवशी, शनिवार, रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी तसेच वेधशाळेने अतिवृष्टीचा इशारा दिला अशा दिवशी :- मुंबई अग्निशमन दलाचे १४७ प्रशिक्षित अधिकारी व जवान, सेमी इन्फ्लेटेबल रेस्क्यु बोट, जेट स्की ऑपरेटर हेल्मेट, स्पाईन बोर्ड, रेस्क्यू बोर्ड / सर्फ बोर्ड, रेस्क्यू ट्यूब, बीच लाईफ गार्ड चेअर, नायलॉन रोप, जेटस्की विथ ट्रॉली, रिंग बॉय, बी.एल.एस. विथ फर्स्ट एड बॉक्स, लाईफ जैकेट, रिचार्चेबल टॉर्च इत्यादी साहित्यांसह तैनात केले जातात.

त्याशिवाय, नागरी सेवेचे ६० जवान, एन.डी.आर.एफ. चे ६० जवान व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे ३० ते ४० सुरक्षा रक्षक यांना दोन पाळ्यांमध्ये तैनात केले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर येथील सामाजिक क्रांतीचे उद्गाते राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीस्थळाचा आराखडा तयार करण्याबाबत

**(४६) * १८८३५ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण),**

**श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील सामाजिक क्रांतीचे उद्गाते राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीस्थळाचा आराखडा तयार असून स्मृती स्थळाच्या भूमीपूजनाचा समारंभ १६ महिन्यांपूर्वी होवून देखील स्मृतीस्थळाचे काम सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत तसेच या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, स्मृतीस्थळामध्ये कोणकोणती कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत,

(४) प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित कामे हाती घेवून ती विहित कालावधीत पूर्ण करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सामाजिक क्रांतीचे उद्गाते राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतीस्थळाचा भुमिपुजन समारंभ दिनांक २९ नोव्हे. २०१३ रोजी झालेला आहे.

(२) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी वास्तुच्या कामाची निविदा महानगरपालिकेच्या निधीमधून दि.११/६/२०१५ रोजी प्रसिध्द केलेली असून निविदा प्रक्रिया पूर्ण होताच सदर काम सुरु होणार आहे.

(३) समाधीस्थळ विकसित करताना पुढील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे :-

- राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची समाधी वास्तु.
- समाधीचे लगत असलेलया डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहाचे नुतनीकरण व त्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जीवनावर आधारीत कलादालनाची निर्मिती कारणे.
- समाधी स्थळाला संरक्षक भिंत बांधणे, पादचारी मार्ग करणे
- लॅन्डस्केपिंग करणे,
- स्वच्छतागृह सुविधा करणे.
- वाहनतळाची सुविधा करणे.
- सदर परिसरामध्ये असणा-या ऐतिहासिक समाधी वास्तुची संवर्धन दुरुस्ती व डागडुजी करणे.
- विद्युतीकरण करणे.
- कंपौंड वॉल बांधणे.

(४) निविदा प्रक्रिया पुर्ण होताच सदर काम प्रत्यक्ष जागेवर सुरु होणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**किनवट ( जि.नांदेड) येथील संदीप धोत्रे या युवकांने पोलीस स्टेशनमध्ये स्वत:ला पेटवून आत्महत्या केल्याबाबत**

**(४७) * १६६५० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) येथील एका व्यापाऱ्याच्या घरी चोरी झाल्यामुळे दिनांक १ जून, २०१५ रोजी किनवट पोलिसांनी वडार समाजाच्या वस्तीवर पहाटे पाच वाजता पुरुष, स्त्रियांना जबर मारहाण केली तसेच संदीप धोत्रे या भटक्या मागासवर्गीय समाजाच्या युवकाच्या घरी जावून त्याचे आई, वडील, बहीण, भाऊ आणि शेजारी राहणाऱ्या कुटूंबातील सदस्यांना बेदम मारहाण करून अटक केल्याची संतापजनक बाब दिनांक २ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अन्यायाविरोधात न्याय मागण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये गेलेल्या संदीप धोत्रे या युवकांने न्याय मिळत नसल्याचे पाहून किनवट पोलीस स्टेशनमध्ये पोलीसांसमक्ष स्वत:ला पेटवून घेवून आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबधीत दोषी पोलीसांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

प्रकरणी आरोपी व इतर सहका-याविरुध्द घरातून चोरी केली असून प्राप्त फिर्यादीनुसार किनवट पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५७/२०१५ भा.दं.वि कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करुन पोलीस पथकाने घटनास्थळी पंचनामा केला. गुन्ह्याचा तपासासाठी पोलीस पथक गंगानगर किनवट येथे आरोपींची माहिती घेण्यासाठी गेले असता आरोपी शोधु नये म्हणून काही पुरुष व महिलांनी पोलीस पथकावर हल्ला केला, वाहनाची तोडफोड केली, पिस्तुल हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला म्हणून सदर हल्ला करणा-यांविरुध्द पोलीसांनी दि.३१/०५/२०१५ रोजी गुन्हा

दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपी मिळून आला नाही. हल्ला करणाऱ्या आरोपींना सीआरपीसी कलम ४१(अ)(१) नुसार नोटीस देवून सोडले आहे.
(२) हे खरे नाही,

आरोपीवर नांदेड व आदिलाबाद जिल्ह्यात चोरी व घरफोडीचे अनेक गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. उक्त नमूद गु.र.नं. ५७/२०१५ या गुन्ह्यात पोलिसांनी अटक करुन नये म्हणून पोलिस यंत्रणेवर दबाव आणण्याच्या उद्देशाने संदिप धोत्रे याने दि.०२/०६/२०१५ रोजी १३.४५ वा च्या सुमारास स्वत:चे अंगावर पेटोल टाकून घेऊन पोलिस स्टेशनच्या पाठीमागून पोलीस स्टेशनच्या कंम्पाऊंडमध्ये येवून व पोलीस स्टेशन मधील अधिकारी/कर्मचारी यांचे लक्षात येण्यापूर्वीच स्वत:ला पेटवून घेतले पोलीस स्टेशन मधील अधिकारी/कर्मचारी यांनी आग विझवून त्याचे प्राण वाचविण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यास तातडीच्या उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. न्यायदंडाधिकारी यांनी त्याचा मृत्यू पुर्व जबाब नोदविला, उपचार चालू असताना तो दि.०२/०६/२०१५ रोजी १७.५६ वा. आरोपी मरण पावला सदर प्रकरणी पोलीस स्टेशन किनवट जि. नांदेड येथे आकस्मात मृत्यू क्र.२२/२०१५ कलम १७४ फौजदार प्रक्रिया संहिता अन्वये नोंद दाखल करण्यात आली आहे.
(३) व (४) मृत्यू प्रकरणी पोलीस स्टेशन किनवट, जि.नांदेड येथे दाखल आकस्मात मृत्यू क्र.२२/२०१५ कलम १७४ फौजदारी प्रक्रिया संहिता चा तपास गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. तसेच सदर घटनेसंबंधी आरोप करण्यात आलेल्या पोलीस उप निरीक्षक श्री.विवेकानंद भारती यांना निलंबित करण्यात आलेले आहे.
(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यात २६ महापालिका, २३६ नगरपरिषदांमध्ये स्वच्छ अभियान राबविण्याबाबत

**(४८) * १६८२२ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर राज्यात २६ महापालिका, २३६ नगरपरिषदांमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबविण्याचा निर्णय शासनाच्या नगरविकास विभागाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ महाराष्ट्र अभियानाअंतर्गत गरिबांना १२ हजारात शौचालय बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांधकाम साहित्याचे दर गगनाला भिडले असताना गरिबांना अल्प रक्कमेत शौचालयाचे बांधकाम पुर्ण करणे शक्य होत नसल्याने सदर योजनेसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबत व सदरील योजना ग्रामीण भागात सक्षमपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यात २६ महानगरपालिका व २३९ नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचा निर्णय शासनाच्या नगर विकास विभागाने घेतला आहे.
(२) स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत ज्या कुटुंबाना शौचालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने ती कुटुंबे उघड्यावर शौचास जातात अशा कुटुंबाना वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील कुटुंबांना केंद्र व राज्य शासनाचे मिळून रुपये ५,०००/- व राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रात केंद्र व राज्य शासनाचे स्वराज्य संस्था क्षेत्रात केंद्र व राज्य शासनाचे मिळून रुपये १२,०००/- अनुदान अनुज्ञेय आहे.
(३) केंद्र व राज्य शासनामार्फत देय असलेल्या अनुज्ञेय अनुदाना व्यतिरिक्त पुढील स्त्रोतामधून निधी उपलब्ध करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत :-

- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग.
- लाभार्थी कुटुंबांचा सहभाग.
- कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी निधी सहभाग (CSR Fund).
- मा.खासदारांचा स्थानिक विकास निधी.

तसेच मा.आमदाराच्या स्थानिक विकास निधीमधून यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे.

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत कोषच्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र कोष स्थापन करण्याची कार्यवाही सुरु आहे. केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत राज्यामधील ग्रामीण भागातही सदर योजना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर तसेच सांगली जिल्हयातील तरूणांना सैन्य दलात**
**भरतीचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत**

**(४९) * २३२२८ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज, आजरा, चंदगड तसेच सांगली जिल्हयातील तासगांव तालुक्यातील १२ तरूणांना सैन्य दलात भरतीचे आमिष दाखवून ३६ लाख रूपयांची फसवणूक केल्याचे माहे मे, २०१५ अखेरीस निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयातील अनेक युवकांची फसवणूक झाली असून याबाबत गडहिंग्लज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गुन्ह्याबाबत पोलिसांनी तपास केला आहे काय व त्यानुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नमूद प्रकरणी गडहिंग्लज पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गु.र.नं ९५/२०१५ भा.दं.वि.कलम ४६४, ४६५, ४६८, ४२० ३४ प्रमाणे दि.२६/०५/२०१५ रोजी २ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल आहे.

(३) गुन्ह्यातील निष्पन्न २ आरोपींना अटक करुन पोलीस कस्टडी रिमांड घेवून तपास करण्यात आला असून दोन्ही आरोपींची दि.१७/०६/२०१५ रोजी मा.न्यायालयाने जामीनावर मुक्तता केली आहे. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**मुंबईतील वास्तव्य करीत असलेल्या बांगलादेशी घुसखोरांवर कारवाई करण्याबाबत**

**(५०) * १८०९७ श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.शशिकांत**

**खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गावदेवी, आग्रीपाडा, ताडदेव, ट्रॉम्बे, शिवाजीनगर, वांद्रे कुर्ला संकुल, शिवडी, तसेच वसई, मिरारोड इत्यादी ठिकाणी वास्तव्य करीत असलेल्या २४२ बांगलादेशी घुसखोरांना दिनांक १५ जानेवारी, २०१५ अखेरपर्यंत मुंबई पोलीसांनी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अटक केलेल्या घुसखोरांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दिनांक ८ एप्रिल, २०१५ अखेरपर्यंत बृहन्मुंबई व इतर ठिकाणी वास्तव्यास असलेल्या २४२ बांगलादेशी घुसखोरांना 'आय' शाखेमार्फत मुंबई पोलीसांनी अटक केली आहे.

(२) मुंबई व उपनगरात नियमितपणे, घुसखोर बांगलादेशी नागरिक शोधून त्यांच्यावर कारवाई केली जाते. ही कारवाई निरंतर चालू असते. घुसखोर बांगलादेशी नागरिकांवर कायदेशीर कारवाई करुन त्यांच्यावर न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात येते न्यायालयात सुनावणी होवून दोषसिध्दी झाल्यावर त्यांना शिक्षा देण्यात येते. दिलेली शिक्षा भोगल्यावर त्यांना त्यांच्या मायदेशी हद्दपार करण्यात येते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्य राखीव पोलीस दलातील सशस्त्र पोलीस शिपाई भरतीत झालेले गैरप्रकार

**(५१) * २२०८९ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य राखीव पोलीस दलाच्या सन २०१४ मध्ये केलेल्या सशस्त्र पोलीस शिपाई भरतीत मोठया प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे दिनांक १२ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस भरतीमधील ७० पात्र उमेदवार ९ महिन्यांपासून दुर्लक्षित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार पात्र उमेदवारांना नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही. सन २०१४ च्या सशस्त्र पोलीस भरतीमध्ये निवड केलेल्या २२० उमेदवारांपैकी ६१ उमेदवारांना रिक्त पदांअभावी नियुक्ती देणे शक्य झालेले नाही.

(३), (४) व (५) सन २०१४ मधील सशस्त्र पोलीस शिपाई भरतीत प्रतिनियुक्तीवर नेमणूक होणे शिल्लक असलेली पोलीस शिपायांची ११२ पदे विचारात घेऊन एकूण २२० पोलीस शिपायांची भरती घेण्याकरीता जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती व एकूण २२० उमेदवारांची निवड करण्यात आली आहे. मात्र प्रतिनियुक्तीवर पोलीस शिपायांची नेमणूक न झाल्याने निवड केलेल्या २२० उमेदवारांपैकी १५६ उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. तसेच, सदर उमेदवारांमधील ३ उमेदवारांनी त्यांची निवड रद्द करण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने त्यांची विनंती मान्य करण्यात आली आहे. उर्वरित ६१ उमेदवारांना रिक्त पदांअभावी अद्याप नियुक्ती देणे शक्य झालेले नाही.

पदोन्नतीमुळे निर्माण होणाऱ्या पोलीस शिपायांच्या रिक्त पदात शिल्लक असलेल्या सर्व ६१ उमेदवारांना नियुक्त्या देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

पोलीस शिपायांची पदे जशी जशी रिक्त झाली आहेत त्यानुसार उमेदवारांना सशस्त्र पोलीस शिपाई पदावर नियुक्त्या देण्यात आल्या असून नियुक्त्या देण्यात विलंब झालेला नाही.

-----------------

## अग्नि सुरक्षेबाबत एन.व्ही.मिरानी समितीने मुंबई महानगरपालिकेला अहवाल सादर केल्याबाबत

**(५२) * १९८५७ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अग्नि सुरक्षेबाबत एन.व्ही.मिरानी समितीने सन २००९ मध्ये मुंबई महानगरपालिकेला अहवाल सादर केला होता तो नगरविकास विभागाकडे मंजुरी करिता प्रलंबीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमरास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावास शासनस्तरावर मंजूरी देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास केव्हापर्यंत मंजूरी मिळण्याचे अपेक्षित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) ते (४) अग्निसुरक्षेबाबत एन.व्ही.मिरानी समितीने मुंबई महानगरपालिकेला सादर केलेला अहवाल नगरविकास विभागाकडे प्रलंबित आहे अशी बाब नाही.

शासनाने मानव निर्मित आपत्तीच्या अनुषंगाने इमारतीच्या सुरक्षिततेच्या संदर्भात एन.व्ही.मिराणी यांच अध्यक्षतेखाली नियुक्त करणेत आलेल्या समितीने दिनांक २०.२.२००९ रोजी सादर केलेला अहवाल स्वीकारलेला आहे. सदर अहवालातील शिफारशीना अनुसरुन राज्यातील महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीत सुरक्षा नियंत्रण विनियम अंतर्भूत करणेसंदर्भात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अेअे) खालील सूचना दिनांक २७.२.२००९ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे. याबाबत अंतिम निर्णय घेणेत आलेला नाही.

-----------------

## गिरणी कामगारांच्या घरासंबधी अनेक प्रश्न प्रलंबित असल्याबाबत

**(५३) * १७२३५ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संग्राम थोपटे (भोर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.संजय रायमुलकर**

**(मेहकर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांच्या घरांसंबधी अनेक प्रश्न प्रलंबित आहेत या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी गिरणी कामगारांनी दिनांक १ मे, २०१५ रोजी कामगार दिनी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या वर्षा बंगल्यावर मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १ लाख ४८ हजार गिरणी कामगारांना घरे मिळावीत याकरीता १६ गिरण्यांच्या जागेवर बांधण्यात येणा-या घरांची तसेच एमएमआरडीएच्या तयार घरांची सोडत काढण्याबाबतचे आश्वासन मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गिरणी कामगारांच्या घरांसंबधी मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

तथापि याबाबत नमूद करण्यात येते की, मुंबईतील १९ कापड गिरण्यांच्या कामगारांकरिता म्हाडास उपलब्ध झालेल्या जमिनीवर एकूण ६,९४८ सदनिका बांधण्यात आल्या असून त्यापैकी २३ सदनिका संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील हुतात्मा गिरणी कामगारांच्या वारसासाठी राखीव ठेऊन उर्वरित ६,९२५ सदनिकांसाठी म्हाडा मार्फत सोडत काढण्यात आली आहे व त्यातील पात्र ५५७३ गिरणी कामगारांना घरांचा ताबा देण्यात आलेला आहे व १३५२ अर्जदारांना वाटप प्रक्रिया चालू आहे.

त्या व्यतिरिक्त म्हाडास जमिनीचा ताबा मिळालेल्या ६ गिरण्यांच्या जमिनींवर गृहनिर्माण योजना प्रस्तावित असून त्यावर गिरणी कामगारांसाठी ६७९४ सदनिका बांधण्याचे नियोजित आहे. त्यापैकी ४ गिरण्यांच्या जागेवर २६३४ सदनिका बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे व उर्वरीत २ गिरण्यांच्या जमिनीवर गृहनिर्मितीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची मंजुरी घेण्यात येत आहे.

त्या व्यतिरिक्त अन्य काही गिरण्यांमधील म्हाडाच्या हिश्श्याची जमीन ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या भाडे तत्वावरील घरे योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील सुधारित तरतूदीप्रमाणे शासनाचे ४ बांधकाम

प्रमाणपत्र प्राप्त प्रकल्पामध्ये २ सदनिकांचे एकत्रिकीकरण करुन ३२० चौ.फुटाच्या सदनिका तयार करण्याचे व सदर सदनिका गिरणी कामगारांना शासन ठरवेल त्या किंमतीवर व अटीशर्तीवर मालकी तत्वावर देण्यासाठी एमएमआरडीएला सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## मुंबई येथील विकासकांद्वारे विकण्यात आलेल्या घरांचा कार्पेट एरिया कमी झाल्याच्या तक्रारीबाबत

**(५४) * २४७६२ श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), अॅड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील वैध मापन शास्त्र विभागाला अलिकडेच मुलूंड, विलेपार्ले, वांद्रे आणि खार रोड येथे बिल्डरांनी विकलेल्या घरांचा कार्पेट एरिया कमी असल्याच्या जवळपास १६ तक्रारी आल्या असून याबाबतच्या तक्रारीवर मुंबई महानगरपालिकेद्वारे कोणतीही कारवाई केली जात नसल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणी शासनातर्फे चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषीविरुध्द कोणती प्रशासकीय व दंडात्मक कार्यवाही करण्यात आली वा प्रस्तावित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

मुंबई येथील वैध मापन शास्त्र विभागाला मुलुंड, विलेपार्ले, वांद्रे व खार रोड येथे बिल्डरांनी विकलेल्या घरांचा कार्पेट एरिया कमी असल्याच्या १६ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर तक्रारींच्या अनुषंगाने वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्या अंतर्गत नियमानुसार एकूण १३ दोषीविरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील लीजच्या जमिनीबाबत प्रशासनाचे होणारे दुर्लक्ष**

**(५५) * १६२९३ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील रेसकोर्स, ताज बिल्डिंग, टाटा सन्स प्रा.लि., दी इंडियन हॉटेल कंपनी लि.इत्यादी सुमारे ४ हजार मालमत्ता मुंबई महानगरपालिकेने लीजवर दिल्या असून त्यापैकी २४३ मालमत्तांची मुदत संपली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लीज संपून ५ ते १५ वर्षे होऊनही या मालमत्तांबाबत मुंबई महानगरपालिकेने अद्याप कोणतेच धोरण तयार केले नाही त्यामुळे या मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत अथवा लीज वाढवून देण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार लीज संपलेल्या जागांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या अभिलेखानुसार ४,१७७ भूभाग मक्त्याने दिलेले असून त्यापैकी २३४ भूभागांचा मक्ता कालावधी संपुष्टात आलेला आहे.

(२) व (३) मक्ता संपुष्टात आलेल्या २३४ मालमत्तांपैकी १२० मालमत्ता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या असून, ११४ मालमत्ता राज्य शासनाच्या मालकीच्या आहेत.

महानगरपालिकेच्या मालमत्तांच्या मक्ता नुतनीकरणाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने धोरण तयार केले आहे.

राज्य शासनाच्या मालमत्तांच्या मक्ता नुतनीकरणाचे धोरण तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील अग्निशमन जवान आणि अधिकाऱ्यांच्या सुरक्षेबाबत

**(५६) * १९६६५ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील अग्निशमन जवान आणि अधिकाऱ्यांना आगीपासून बचाव करता यावा यासाठी खरेदी केलेल्या २,३०० पर्सनल प्रोटेक्टिव्ह इक्वीपमेंट (पीपीई) संचापैकी फक्त ६२० संच वापरात असून सुमारे १,७०० संच जवानांच्या मापानुसार नसल्याने वापराविना पडून असल्याचे दिनांक १३ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १,७०० संच पडून असल्याने मुंबई महानगरपालिकेचे तब्बल २० कोटी ६७ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून या प्रकाराला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यावर व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. मुंबई अग्निशमन दलाने अधिकारी व कर्मचारी यांची आगीपासून सुरक्षिततेकरीता सन २०१० मध्ये प्रथमत:च २३२० पर्सनल प्रोटेक्टीव्ह इक्वीपमेंट (पी.पी.ई) संचाची खरेदी केली होती.

सुरुवातील पुरवठादाराने पुरवठा केलेल्या २३२० संचांपैकी ६२० संच हे मोजमापामध्ये योग्य होते. तसेच १७०० संचांच्या मोजमापामध्ये काही त्रुटी निर्माण झाल्या होत्या. सदर त्रुटींची पुरवठादाराकडून टप्प्याटप्प्याने पूर्तता करण्यात आली.

त्यामुळे सर्व २३२० संचांचा योग्य प्रकारे वापर महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी सर्व प्रकारची आग विझविताना करीत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथे मलजल प्रक्रिया प्रकल्प उभारण्याबाबत

**(५७) * २०३३२ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा, वरळी, वांद्रे, वर्सोवा, मालाड, घाटकोपर, भांडुप आदीं ठिकाणी अद्ययावत मलजल प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी पालिकेने सन २००५ मध्ये 'मॉट मॅकडोनाल्ड' या सल्लागाराची नियुक्ती केली असून त्यास दोन वेळा मुदतवाढही देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेने सन २००५ मध्ये नियुक्त केलेल्या मॉट मॅकडोनाल्ड या सल्लागाराला आतापर्यंत १८० कोटी रुपये अदा करुनही एकाही मलजल प्रक्रिया केंद्राचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आता तर नव्या सल्लागाराची नियुक्ती करण्याचे महापालिकेने निश्चित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. सन २००७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या मॉट मॅकडोनाल्ड आणि कंसोरटियम या सल्लागारास सन २०१२ मध्ये एकदाच मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. सदर कंत्राटाद्वारे सल्लागारांना मलजल प्रक्रिया केंद्राच्या निविदा मागविण्याच्या अनुषंगाने विविध कामे देण्यात आली होती.

यापैकी ३२ कामांचे विविध अहवाल व १० कामांच्या मसुदा निविदा सल्लागारांनी एप्रिल, २०१५ पर्यंत पूर्ण करुन सादर केलेल्या आहेत. या केलेल्या कामांच्या अनुषंगाने सल्लागारांना रु.१४१.७७ कोटी इतके अधिदान करण्यात आले आहे.

या विविध अहवालानुसार मलजल प्रक्रिया केंद्रांच्या कामांच्या निविदा मागविण्याच्या प्रक्रियेस सुरुवात करण्यात आलेली आहे.

(३) मुंबई मलनि:सारण प्रकल्पाची व्याप्ती मोठी असल्याने आणि मे.मॉट मॅकडोनाल्ड या सल्लागाराची वाढीव मुदत एप्रिल २०१५ मध्ये संपुष्टात आल्यामुळे निविदा मागविणे व कामांचे परिरक्षण करणे इत्यादी कामांकरिता नवीन सल्लागारांची नियुक्ती करण्याची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**कल्याण (पूर्व) भागातील पुणे लिंक मार्गावरील रस्त्याचे सिमेंटीकरण व कोळसेवाडीतील रस्ता रुंदीकरणात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(५८) * २०२१२ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (पूर्व) भागातील पुणे लिंक मार्गावरील रस्त्याचे सिमेंटीकरण व कोळसेवाडीतील रस्ता रुंदीकरणात रुपये २१ कोटींच्या योजनेत गैरव्यवहार झाल्याची घटना माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**वाडीव-हे (जि.नाशिक) गावाजवळ स्विक्वेल लॉजिस्टिक सिक्युरिटी एजन्सीच्या व्हॅनवर पडलेल्या दरोड्याबाबत**

**(५९) * १९७१० डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या अंधेरी भागातील स्विक्वेल लॉजिस्टिक सिक्युरिटी एजन्सीच्या व्हॅनमधील ६० किलो सोन्याचा विटा चोरट्यांनी दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजी मुंबई-आग्रा रोडवरील नाशिक जवळील वाडीवऱ्हे गावाजवळ दरोडा टाकून चोरुन नेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) प्रश्नात नमूद कंपनीच्या ५८ किलो सोन्याच्या विटा दरोडा टाकून चोरुन नेल्याबाबत वाडीवऱ्हे पोलीस ठाणे जि.नाशिक येथे गु.र.नं. ४०/२०१५ भा.द.वि. कलम ३९५, ३४२, १७०, १२० ब, आर्म ॲक्ट ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

(२) व (३) होय,

दाखल गुन्ह्याच्या तपासात नमूद कंपनीच्या आरोपी सुरक्षा रक्षकांनी गुन्ह्यातील मुख्य आरोपी यांचेशी संगनमत करुन गुन्ह्याचा कट रचला व दि.२४/०४/२०१५ रोजी नमूद कंपनीचे सोने घेवून जाणा-या वाहनाचा व त्यातील इसमाबाबत परिपूर्ण माहिती मुख्य आरोपींना दिली. त्यानुसार मुख्य आरोपींना सदर वाहनाचा पाठालाग, करत सदरचे वाहन वाडीवऱ्हे शिवारात आडवून वाहनाचे चालक, फिर्यादी व साक्षिदार रक्षक यांना रिव्हॉल्वरचा धाक दाखवून त्यांचे हातपाय बांधून प्रत्येक १ किलो वजनाच्या ६० सोन्याच्या विटापैकी ५८ विटा दरोडा टाकून चोरुन नेल्या. गुन्ह्यातील ५ आरोपीपैकी ३ आरोपींना अटक करण्यात आली असून सद्य:स्थितीत सदर अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. गुन्ह्यातील इतर आरोपींना अटक करणे व चोरी गेलेला माल हस्तगत करणेवर पोलीस तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**राज्यात महिला व बालकांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(६०) * १६६३० श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल मोटे (परांडा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महिला व बालकांवरील अत्याचाराचे प्रमाण प्रचंड वाढले असून इतर राज्याच्या तुलनेत सर्वाधिक बलात्काराचे गुन्हे घडले असून दर साडेचार तासात एका महिलेवर बलात्काराचा प्रयत्न होत असल्याचे नॅशलन क्राईम रेकॉर्ड ब्युरोने (एनसीआरबी) यांनी माहे जून, २०१५ वा त्यादरम्यान दिलेल्या अहवालात नमूद केलेल्या आकडेवारीत समोर आले असून बलात्काराच्या प्रयत्नाचे २०१६ प्रकरणे, विनयभंगाचे १७४, बालकांचे अपहरणाचे २६५५ व बालकांविरुध्द ८३३६ गुन्हे घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या गत दीड वर्षात १ हजार १३८ घटना घडल्याची तसेच १४ वर्षाखालील बालकांच्या लैंगिक गुन्ह्यात जवळपास दुपटीने वाढ झाल्याची माहिति मनोधैर्य योजनेच्या आकडेवारीवरुन माहे मे, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मुंबई गत तीन महिन्यात लहान मुलींचे अपहरणाचे २२८ तर बलात्काराचे १०० गुन्हे झाल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात सदर गुन्हे रोखण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात महिला व बालकावरील अत्याचाराच्या जानेवारी २०१५ ते मे २०१५ या कालावधीमध्ये गुन्ह्यांची सांख्यिकी माहिती खालील नमूद तक्त्या देण्यात आली आहे.

**महिलांची माहिती :-**

| गुन्ह्याचा प्रकार | जाने. २०१५ ते मे २०१५ पर्यंत |
|---|---|
| बलात्कार | १५८५ |
| बलात्काराचा प्रयत्न | ११ |
| विनयभंग | ५२५० |

**बालकाची माहिती :-**

| शिर्ष | जाने. २०१५ ते मे २०१५ |
|---|---|
| बालकांचे अपहरण | २३९४ |
| बालकांविरुध्दचे एकूण गुन्हे | ५०३५ |

(२) नाही.
(३) अंशत: खरे आहे.

लहान मुलींच्या अपहरणांच्या गुन्ह्याची संख्या १९६ तर बलात्काराच्या गुन्ह्यांची संख्या ९६ आहे.
(४) १. महिलांवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी महिला अत्याचार प्रतिबंधक कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

२. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचा तातडीने निपटारा होण्यासाठी सर्व आयुक्तालय व जिल्ह्यांमध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

३. जिल्हा/आयुक्ताल पातळीवर तसेच पोलीस स्टेशन पातळीवर महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

४. बलात्कारासारख्या गंभीर गुन्ह्यांचा तपास जलद गतीन व्हावा तसेच बलात्कारासारख्या गुन्ह्यांना आळा बसावा याकरिता सर्व घटक प्रमुखांना मार्गदर्शक सुचना परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

५. महिलांवरी अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी राज्यात २७ विशेष न्यायालये स्थापन करण्यात आलेली आहेत.

६. सर्व पोलीस घटकातील पोलीस ठाण्यातील प्रत्येकी एका अधिकाऱ्यांस बाल कल्याण अधिकारी म्हणून नामनिर्देशित केले आहे. तसेच सर्व पोलीस घटकाच्या ४५ मुख्यालयात विशेष बाल पोलीस पथक स्थापन करण्यात आले आहेत.

७. बालकांचे लैंगिक छळास प्रतिबंध अधिनियम-२०१२ च्या प्रभावी अंमलबजावणीकरीता सर्व पोलीस घटक प्रमुखांना सुचना निर्गमित करुन कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमध्ये महिलांसाठी अपुरी स्वच्छतागृहे असल्याबाबत

**(६१) * १७१५१ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.संजय कदम (दापोली), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमध्ये महिलांसाठी अपुरी स्वच्छतागृहे असल्यामुळे त्यांची कुचंबणा होत असल्याने अनेक महिलांना शारिरीक व मानसिक आजार होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शहरातील मुख्य रस्त्याबरोबरच अन्य महत्वाची ठिकाणे आणि बाजारपेठेत खेरेदी-विक्रीसाठी येणाऱ्या महिलांसाठी स्वच्छता गृहांची योजना अंमलात आणण्यास टाळाटाळ करणाऱ्या पालिकांवर कारवाई करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाने मागील सुनावणी दरम्यान राज्यातील प्रमुख शहरांमध्ये स्वच्छतागृहे उभारावीत असे निर्देश दिले आहेत परंतु त्यावर काही मोजक्या महानगरपालिकांनी अंमलबजावणी केली आहे उर्वरित पालिका व महानगरपालिका यांच्यावर शासनाने कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. तथापि शहरांमध्ये अपुरी स्वच्छतागृहे असल्यामुळे सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावरुन जाणाऱ्या महिलांना स्वच्छतागृहांची सुविधा उपलबध करुन द्यावी  व ती स्वच्छ ठेवावीत म्हणून "मिळून साऱ्याजनी" या संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिक क्रमांक ९८/२०११ दाखल केली आहे. त्या जनहित याचिकेची दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी सुनावणी झाली आहे.
(२) हे खरे नाही, जनहित याचिका क्रमांक ९८/२०११ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी महानगरपालिकांनी योजना तयार करुन मा.न्यायालयास प्रतिज्ञापत्राद्वारे दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत सादर करण्याचे आदेश दिले आहेत. परंतु, मुंबई, पुणे अमरावती व नागपूर महानगरपालिका वगळता उर्वरित महानगरपालिकांनी विहित कालावधीत प्रतिज्ञापत्र दाखल न केल्याने त्यांना प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास दि. २१.४.२०१५ च्या आदेशान्वये दिनांक १९ जून २०१५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ची अंमलबजावणी राज्यामध्ये सुरु झाली आहे. या अभियानांतर्गत राज्यातील सर्व शहरांमधील तरंगती लोकसंख्या असलेल्या ठिकाणी पुरेशा संख्येने सार्वजनिक शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार अहे. त्यामध्ये पुरुषांसाठी व महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था राहणार आहे.
(३) स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत सार्वजनिक ठिकाणी पुरेशा संख्येने सार्वजनिक शौचालये उभारण्याबाबत व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विहित कालावधीत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधित महानगरपालिकांना शासन स्तरावरुन देण्याचा आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने अनुपालन अहवाल सादर करण्याबाबत

**(६२) * २२२११ श्री.संजय पोतनीस (कलिना) : तारांकित प्रश्न क्रमांक १२१९८ ला दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कलिना येथील टँक प्रापर्टी येथे आरक्षीत क्रीडा संकुलाच्या अंदाजे १३ एकर जागेवर तलावात भराव टाकून अतिक्रमण सुरु असल्याबाबतच्या स्थानिक लोकप्रतिनिधीच्या निवेदनावर आवश्यक कार्यवाही करुन अनुपालन अहवाल शासनास पाठविण्याच्या सूचना दिनांक १९ मार्च, २०१५ रोजीच्या पत्रान्वये मा.मंत्री महोद्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सूचनेनुसार महानगरपालिकेने अनुपालन अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) सदर अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शासनास अद्यापी प्राप्त झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हसवड (ता. जि. सातारा) येथील पळसावडी येथील टाटा पावर सोलर एजन्सी विरोधात कामगारांनी बेमुदत उपोषण सुरु केल्याबाबत

**(६३) * १७०२७ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हसवड (ता. जि. सातारा) येथील पळसावडी येथील टाटा पावर सोलर एजन्सी विरोधात कामगारांनी बेमुदत उपोषण सुरु केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी पळसावडी, देवापूर हद्दीतील हजारो एकर शेती प्रकल्पासाठी घेताना नोकरीचे आमिष दाखवले होते मात्र या कामगारांच्या जमिनी अल्प किंमतीत घेऊन त्यांना सुरक्षा रक्षकाची नोकरी देण्यात आली व सुरुवातीला

रुपये १६ हजार दरमहा वेतन देणा-या या कंपनीने या भूमिपुत्रांना पगार कमी करुन तो ७ हजार रुपयांवर नेऊन ठेवला, यामुळे सदरहू कामगारांची कंपनीने फसवणूक केली असल्याने शासनाने यासंदर्भात चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) हे अंशत: खरे आहे. दि.१३/०४/२०१५ ते १५/०४/२०१५ या कालावधीत साखळी उपोषण करण्यात आले होते.
(२) हे खरे नाही. कामगारांच्या विविध मागण्यांवर कामगार, कंत्राटदार व मुख्य मालक यांच्यामध्ये तडजोड होऊन कामगारांचे वेतन व भत्त्यामध्ये वाढ करण्याबाबत निर्णय झाला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वाकोला पोलीस ठाण्यातील वरीष्ठ पोलीस निरीक्षकाची गोळया झाडून हत्या केल्याबाबत

**(६४) * १९६६९ श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय कदम (दापोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वाकोला पोलीस ठाण्यातील सहायक पोलीस निरीक्षक दिलीप शिर्के यांनी वरीष्ठ पोलीस निरीक्षक विलास जोशी यांची दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास गोळ्या झाडून हत्या केली व त्यानंतर स्वतः आत्महत्या केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, तथापि दिनांक ०२.०५.२०१५ रोजी सदरची घटना घडलेली आहे.
(२) होय, सदर प्रकरणी गु.प्र.शा., गुन्हे अन्वेषण विभाग, गुरक्र. ०/१५ कलम ३०२, ३०७, ३३२ भांदवि सह कलम ३, २५, २७ भाहका. वाकोला पोलीस ठाणे गुरक्र. २०४/१५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) सदर गुन्ह्याच्यातपास दरम्यान नोंद कलेले जाबजबाब व वैद्यकीय अहवाल यावरुन यातील सहायक पोलीस फौजदार दिलीप शिर्के यांनी त्यांच्याकडील सर्विस रिव्हॉल्वर मधून वरिष्ठ पोलीस निरिक्षक विलास जोशी यांच्यावर गोळीबार केल्याने त्यामध्ये त्यांचा मृत्यु झाला व एक साक्षीदार हे जखमी झालेले आहेत. त्यानंतर सहायक पोलीस फौजदार दिलीप शिर्के यांनी त्यांचे स्वत:चे सर्विस पिस्टल मधून स्वत:वर डोक्यात गोळीमारुन घेवून आत्महत्या केली आहे. प्रस्तु घटनेबाबत वरीलप्रमाणे दखलपात्र गुन्हयाची नोंद करण्यात आली असून गुन्हे शाखा, गुअवि, कक्ष-८ , अंधेरी, मुंबई तपास करीत आहेत. सदरचा गुन्हा हा तपासाधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने कचोरे टेकडीवरील बगीचाकरीता आरक्षणाची जागा भाडे तत्वावर टाटा पॉवर कंपनीला नाममात्र दराने दिल्याबाबत**

**(६५) * १९९०६ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने कचोरे टेकडीवरील बगीचा करीता आरक्षणातील १०० चौ.मीटर जागा बाजारमुल्याप्रमाणे शुल्क न आकारता फक्त १ रुपया नाममात्र दराने ३० वर्षाच्या भाडे तत्वावर टाटा पॉवर कंपनीच्या मनोऱ्यासाठी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महासभेमध्ये कंपनीकरीता बाजारमुल्याप्रमाणे शुल्क आकारून महानगरपालिकेचे उत्पन्न का वाढविण्यात आले नाही म्हणून मनोरा उभारण्यास विरोध करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे .

मात्र, प्रचलित सिध्दगणक दरानुसार रु. १३,६०,०००/- इतकी अधिमुल्य रक्कम आकारुन रु. १/- प्रति वर्ष एवढ्या नाममात्र भाडे तत्वावर सदरची जागा ३० वर्ष कालावधीकरीता टाटा पॉवर कंपनीच्या मनोऱ्यासाठी देण्याबाबत महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१० दि.१९/५/२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील बरांज मोकास येथील कर्नाटका एम्टा कंपनीच्या आधिका-यांनी कर बुडविल्याबाबत**

**(६६) * २२१५७ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील बरांज मोकासा येथील कर्नाटका एम्टा कंपनीच्या कोळसा खाणीतील कार्यरत आधिका-यांनी ९० हजार कोटी पेक्षा जास्त रुपयांच्या राष्ट्रीय संपत्तीचा कर बुडविल्या प्रकरणी भद्रावती पोलीस स्टेशनमध्ये कंपनीच्या पाच अधिका-यांवर एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने शासनाच्या अटी व शर्तीचा भंग करुन ९०० एकरात अवैधरित्या कोळसा उत्खनन केले असून यात ४ सरकारी पांदन रस्त्यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडून ९०० एकरात अवैधरित्या कोळसा उत्खनन केले असून यात ४ सरकारी पांदन रस्त्यांचा समावेश आहे का याबाबतचा अहवाल अप्राप्त आहे.

(३) व (४) या प्रकरणी भद्रावती (जि.चंद्रपूर) येथील बरांज मोकासा येथील कर्नाटका एम्टा कंपनीच्या कोळसा खाणीतील कार्यरत अधिकाऱ्यांनी ९० हजार कोटी पेक्षा जास्त रुपयांच्या राष्ट्रीय संपत्तीचा कर बुडविल्या प्रकरणी भद्रावती पोलीस स्टेशनमध्ये कंपनीच्या पाच अधिकाऱ्यांवर मा.न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी भद्रावती येथे गु.र.क्र.एम-१/२०१५, भा.दं.वि. कलम ३७९, ३४ अन्वये दिनांक ०५ एप्रिल, २०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरण पोलीस तपासावर प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**श्री. क्षेत्र पारुंडे (ता.जुन्नर जि.पुणे) येथील शाही कुंभमेळ्याकरीता निधी मिळणेबाबत**

**(६७) * २२२३६ श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.क्षेत्र पारुंडे, (ता.जुन्नर जि.पुणे) येथे सन २०१५ मध्ये भरणा-या शाही कुंभमेळ्याकरीता मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने ४०६७.९६ लक्ष रुपयांचा निधी तातडीने मंजूर करावा याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ डिसेंबर, २०१४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कुंभमेळ्याच्या पुर्व तयारीच्या दृष्टीकोनातून शासनाकडून उपरोक्त निधी देण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला आहे,

(३) त्यानुसार हा निधी प्रत्यक्षात केव्हा उपलब्ध होणार आहे व त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५-१६ करीता शासन निर्णय दिनांक २८.०८.२०१४ अन्वये, श्रीक्षेत्र पारुंडे, ता.जुन्नर येथील विविध विकास कामांसाठी रुपये १० कोटी निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी रुपये ६.०० कोटी निधी जिल्हाधिकारी, पुणे यांना वितरीत केला आहे. तसेच शासन निर्णयात नमुद केलेली कामे ५० टक्के पुर्ण झाल्यावर व त्याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडून प्राप्त झाल्यावर उर्वरित निधी वितरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**मुंबई शहरातील भुलाभाई रोडवरील महानगरपालिकेच्या मालकीचा भूखंड सार्वजनिक वाहनतळासाठी राखीव ठेवल्याबाबत**

**(६८) * २४६६३ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शरददादा सोनवणे (जुन्नर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील भुलाभाई रोडवरील महानगरपालिकेच्या मालकीचा सुमारे १ हजार ५६ चौरस मीटरचा भूखंड सार्वजनिक वाहनतळासाठी राखीव असल्याने सन २००३ मध्ये आकृती बिल्डर्सला विकास करण्यासाठी देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकासकांनी उपरोक्त भूखंडावर २० मजली इमारत उभारण्यात आली असून सदर इमारत महानगरपालिकेला न देता या इमारतीमध्ये विकासकांनी अनधिकृत हॉटेल, हुक्कापार्लर व अन्य आक्षेपार्ह बाबीस जागा दिली असल्याचे दिनांक २ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) महापालिकेच्या पार्किग, स्वच्छतागृह व समाजकेंद्र याकरिता आरक्षित असलेला शहर सर्वेक्षण क्र. २/८३९, मलबार हिल डिव्हीजन हा भूखंड महानगरपालिकेने बांधा, वापरा व हस्तांतरण करा या तत्वावर सन २००२ मध्ये निविदा मागवून विकासासाठी आकृती निर्माण प्रा.लि. यांना दिलेला आहे.

(२) महानगरपालिकेने विकासकाबरोबर केलेल्या कराराच्या अटीप्रमाणे आकृती निर्माण प्रा.लि. यांनी इमारतीच्या विंग अे-मध्ये २० मजल्याचे सार्वजनिक वाहनतळ बांधून पाच वर्ष चालवून दिनांक १५.६.२०१५ रोजी महानगरपालिकेस हस्तांतर केलेले आहे. इमारतीच्या विंग बी मध्ये ४ मजल्याची विक्रिघटकाची इमारती असून सदर इमारत आकृति बिल्डर्स यांना ९९ वर्षाकरिता भाडेपट्ट्यावर देणेत आलेली आहे. या व्यावसायिक इमारतीमध्ये ३ उपहारगृहांना महानगरपालिका अधिनियम ३९४ अन्वये परवाने देण्यात आलेले आहेत. महानगरपालिकेच्या आरोग्या खात्याच्या अधिकारी यांनी पहाणी केली असता हुक्कापार्लर असल्याचे आढळून आलेले नाही. तथापि

नियम व अटींचा भंग झाल्याने हॉटेलचालकांविरुध्द मा.न्यायालयामध्ये दावे दाखल करणेत आलेले असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील बोरीवली (प.) गोराई - ३ येथील भूखंड शासकीय रुग्णालय व पोस्ट ऑफिससाठी आरक्षित असल्याबाबत**

**(६९) * १८१६० श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील बोरीवली (प.) गोराई - ३ येथील शासकीय रुग्णालय व पोस्ट ऑफिससाठी आरक्षित असलेला सुमारे १२ हजार ४०१.९० चौरस मिटरचा भूखंड गेल्या २० वर्षापासून पडून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागात शासकीय रुग्णालय व पोस्ट कार्यालय नसल्याने गोराई येथील जेष्ठ नागरीक व सर्वसामान्य जनता यांना पीएफ, पेन्शन इत्यादी कामासाठी बोरीवली पूर्व व चारकोप नाका येथे तसेच रुग्णांना उपचारासाठी कांदिवली (प.) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मध्ये उल्लेखित आरक्षित भूखंडावर रुग्णालय व पोस्ट ऑफिस सुरू करण्याबाबत स्थानिक जनतेने मा.मुख्यमंत्री व स्थानिक लोकप्रतिनिधींकडे निवेदनाद्‌वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त आरक्षित भूखंडावर रुग्णालय व पोस्ट ऑफिस इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) गोराई-३ च्या मंजूर आराखड्यानुसार हॉस्पिटलसाठी १२४०१.९० चौ.मी. व पोस्ट ऑफिससाठी ५०० चौ.मी. भूखंड उपलब्ध आहे.
(२) गोराई-२ भागात महापालिकेचा दवाखाना व आरोग्य केंद्राद्‌वारे प्राथमिक आरोग्य सुविधा (आरोग्य निदान, उपचार लसीकरण, प्रयोग शाळा इत्यादी) पुरविल्या जातात.

सदर ठिकाणावरुन साधारण २.५ किमी अंतरावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आहे. या ठिकाणीबाह्यरुग्ण सेवा व आंतररुग्ण सेवा पुरविल्या जातात.

(३), (४) व (५) रुग्णालयासाठीच्या सदर भूखंडाच्या विक्रीसाठी डिसेंबर, २००४ मध्ये म्हाडाने निविदा काढली होती. मात्र नंतर परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी म्हाडातर्फे योजना राबविण्याचा निर्णय सन २००८ मध्ये घेण्यात आल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली. त्याविरुध्द मे.केसर ट्रेडिंग कंपनी या निविदाकार कंपनीने मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून सध्या प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच सदर भूखंडाचा काही भाग सी.आर.झेड १ अंतर्गत बाधित असल्यामुळ याबाबत सुध्दा म्हाडा विरुध्द मुंबई पर्यावरण कृती समिती व इतर अशी याचिका क्र.८७/२००६ मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## मुंबईवरील अतिरेकी अहल्यानंतरही सागरी सुरक्षेकरिता कोणत्याही पायाभूत सुविधा सुरु झाल्या नसल्याचे कॅगच्या अहवालावरुन स्पस्ट झाल्याबाबत

**(७०) * २०१६३ श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवर अतिरेक्यांनी २६/११ रोजी केलेल्या हल्ल्यानंतर सागरी सुरक्षेसाठी सागरी पोलीस ठाणी उभारणी, गस्तीनौका यासह अनेक घोषणा राज्य शासनाने केल्या असल्या तरीही प्रत्यक्षात कोणत्याही पुरेशा पायाभूत सुविधा सुरू झाल्या नसल्याचे कॅगच्या अहवालावरून स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सागरी सुरक्षेबाबत २००५ पासून वारंवार पाठपुरावा होत असूनही गत ९ वर्षामध्ये सागर तटीय पोलीस ठाणे, तपासणी नाके, जेटीचे काम करून पुरेशा पायाभूत सुविधा निर्माण करण्याचे उद्दिष्ट साध्य करता आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गस्तीनौका तसेच अन्य तांत्रिक कामासाठी पुरेसे कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक असतानाही तज्ञ आणि तंत्रज्ञ व तंत्रज्ञेत्तर कर्मचाऱ्यांची तूट ५१ टक्के व ६७ टक्के एवढी आहे तसेच सागरी तट पोलीस स्थानकांतील केवळ ४३ टक्के पोलीसांना तटरक्षक दलाकडून सागरी कामकाजांचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे तर ५७ टक्के कर्मचाऱ्यांना पोहताच येत नसल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, घुसखोरी व अतिरेकी कारवायांपासून संवदेनक्षम नौका तळाचे संरक्षण करण्यासाठी शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सागरी सुरक्षेसाठी राज्यामध्ये एकूण ४४ सागरी पोलीस ठाणी असून त्यापैकी ४३ पोलीस ठाणी कार्यरत आहेत. तसेच दिवसरात्र ६९ पोलीस बोटी गस्तीकरीता कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही.

सागरीसुरक्षा योजना फेज १ अंतर्गत १२ सागरी पोलीस ठाणी व ३२ चेकपोस्ट नव्याने निर्माण केली आहेत. शिवाय ५६ चेकपोस्ट पूर्वीपासूनच अस्तित्वात आहेत. तसेच फेज २ अंतर्गत ७ पोलीस ठाणी मंजूर करण्यात आलेली आहेत.

सागरी गस्तीकरीता पोलीसांकडील एकूण ६९ बोटींना महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डच्या अखत्यारित जेट्टींचा वापर करण्यास एमएमबीने परवागी दिलेली आहे. तसेच महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डच्या निवडक १४ जेट्टींवर पोलीसांसाठी ऑपरेशनल रुम बांधण्याचे कामे सुरु आहे.
(३) पोलीस बोटींकरीता एकूण १००४ तांत्रिक पदे मंजूर करण्यात आलेली असून त्यापैकी ४०९ कायमस्वरुपी पदे कार्यरत आहेत. ९८ कंत्राटी पदे कंत्राट पध्दतीने भरण्यात आलेली आहेत. उर्वरित पदांची भरती प्रक्रिया विशेष पोलीस महानिरीक्षक मोटार परिवहन या आस्थापनेकडून होणार आहे.

सागरी पोलीसांना तटरक्षक दलाकडून ४ आठवड्याचे प्रशिक्षण देण्यात येत असून आतापर्यंत ५७ बॅचेसद्वारे एकूण १४४६ पोलीसांनी सदरचे प्रशिक्षण घेतलेले आहे.

त्याचप्रमाणे सर्व सागरी पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.
(४) सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पोलीसांना मदत करण्याकरीता सागरी किना-यावरील गावांमध्ये नागरिकांची सागरी सुरक्षा दले निर्माण करण्यात आलेली आहेत. सागरी पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत असलेले पोलीसांना कोस्टगार्डतर्फे प्रशिक्षण देण्यात आलेले आहेत. सर्व सागरी जिल्हयात बोटीद्वारे दिवसरात्र गस्ती घालण्यात येते. पोलीस नियंत्रण कक्षामध्ये सागरी सुरक्षेकरिता टोल फ्री क्र.१०९३ सुरु करण्यात आलेला आहे. महाराष्ट्राच्या सागरी किना-यावर ५ रडार यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोपखेलगाव (पुणे) येथील गावक-यांवर पोलिसांनी अमानुष लाठीमार केल्याबाबत**

**(७१) * २२५३७ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोडी (पुणे) येथील लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालय (सी एम ई) हद्दीतील बोपखेलगाव ते दापोडी हा बंद केलेला रस्ता परत सुरु करावा अशी मागणी करणा-या महिला, मुले व गावक-यांवर दिनांक २१ मे, २०१५ रोजी पोलिसांनी अमानुष लाठीमार करुन अश्रूधुराचे नळकांडे फोडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांनी ७६ महिलांसह १८९ जणांना अटक केली असून ८०० ग्रामस्थांविरुध्द दंगलीचा गुन्हा दाखल केल्यामुळे तसेच पोलीसांनी अमानुष लाठीमार केल्याने गावक-यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच बंद केलेला रस्ता पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बोपखेलगाव ते दापोडी हा बंद केलेला रस्ता पुन्हा सुरु करणेबाबत दिनांक २१ मे, २०१५ रोजी अचानक ५०० ते १००० ग्रामस्थ बेकायदेशीररित्या जमले असता पोलीस पथकाने सदरचा जमाव हा बेकायदेशीर असून लोकांनी येथून निघून जावे असे आवाहन केले. तथापि, सदरच्या जमावाने आवाहनास प्रतिसाद न देता पोलीसांवर अचानकपणे दगडफेक सुरु केली. तयामुळे पोलीसांना बळाचा वापर करावा लागला.

या प्रकरणी भोसरी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१६०/२०१५, भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३५३, ३२३, ३३३, ३२४, ३२५, ३२६, १२० (ब), १८८, ४२७, १०८ सह क्रिमीनल ॲमेंडमेंट ॲक्ट कलम ७ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा कलम ३, ७, म.पो.का. कलम ३७(१) सह १३५ अन्वये १०२ पुरुष आरोपी ७४ महिला आरोपी १३ विधीसंघर्षीत बालके व इतर ७०० ते ८०० इसम यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.
(३) व (४) भोसरी पोलीस स्टेशनच्या अखत्यारीत मौजे बोपखेल हे गांव येत असून याच परिसरातून दापोडी येथून मौजे बोपखेल येथे जाण्यासाठी पुर्वीपासुनचा २० फुटी डांबरी रस्त्याचे वापराबाबत बोपखेलचे ग्रामस्थ व सी.एम.ई. प्रशासन यांचेमध्ये गेले अनेक वर्षापासून वाद आहे.

सदर रस्ता दिनांक १२ मे, २०१५ रोजीपर्यंत ग्रामस्थांना वापरण्यासाठी खुला होता व सी.एम.ई. च्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सदरचा रस्ता रात्रौ २३.०० वा ते सकाळी ०६.०० वा. पर्यंत तसेच अधून मधून दिवसाही सी.एम.ई. प्रशासनामार्फत बंद ठेवण्यात येत होता.

याविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे ग्रामस्थांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्र.१०९१५/११ वर दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी न्यायालयाने सी.एम.ई. च्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अंतरीम आदेश दिले आहेत.

वरीलप्रमाणे न्यायालयाने आदेश दिल्यामुळे सी.एम.ई. चे अधिका-याने दिनांक १२ मे, २०१५ रोजी भोसरी पोलीस ठाण्यात लेखी पत्र देऊन सदरचा रस्ता दिनांक १३ मे, २०१५ पासून बंद केलेला आहे.

सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईकरांना परवडणा-या घरांसाठी गृहनिर्माण धोरण तयार करण्याबाबत**

**(७२) * १६८८३ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील एकीकडे टोलेजंगी इमारती उभ्या राहत असताना दुसरीकडे चाळींचा पुनर्विकास, गृहनिर्माण धोरण आदी महत्वाच्या मुद्यांबाबत निर्णय अद्याप प्रलंबित असल्याने सर्वसामान्य मुंबईकरांना परवडणा-या घरांसाठी गृहनिर्माण धोरण तयार करण्याच्या मागणीसाठी मुंबईत घर हक्क आंदोलन समितीने दिनांक २६ एप्रिल, २०१५ रोजी एका मेळाव्याचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील आंदोलनात गिरणी कामगार, डबेवाले, रिक्षा-टॅक्सीवाले, परिचारिका, महानगरपालिका सफाई कर्मचारी, पोलिसांचे कुटूंबिय, बेस्ट कर्मचारी, रेल्वे कामगार, बँक कर्मचारी, पोस्टमन आदींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने परवडणा-या घरांसाठी काय नियोजन केले आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) व (२) गृह विभागाच्या अहवालावरुन दिनांक २६.४.२०१५ रोजी महाराष्ट्र हायस्कूल मैदान, ना.म.जोशी मार्ग, मुंबई या ठिकाणी गिरणी कामगार संघर्ष समितीतर्फे गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळण्याकरिता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्यात २०० ते २५० गिरणी कामगारांनी सहभाग घेतला होता.

(३) व (४) राज्याचे प्रारुप गृहनिर्माण धोरण व कृती आराखडा २०१५ चा मसुदा यशदामार्फत तयार करण्यात आला असून त्यामध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल घटक, अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गट यांच्यासाठी गृह निर्मितीवर विशेष भर देण्यात आला आहे. राज्यातील सर्व संसद सदस्य व विधानमंडळ सदस्य तसेच प्रशासकीय विभागाच्या सचिवांना सूचना व शिफारशीकरिता पाठविण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून सदर धोरणासंबंधी प्राप्त सूचना/अभिप्रायाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

## मुंबई-आग्रा महामार्गावर तवेरा गाडीला कोकणगाव फाटयाजवळ झालेला भीषण अपघात

**(७३) * १७३३४ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-आग्रा महामार्गावर नाशिकहून पिंपळगावला निघालेल्या तवेरा गाडीला कोकणगाव फाटयाजवळ टेम्पोने जोराची धडक दिल्याने दिनांक १८ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास झालेल्या भीषण अपघातात ५ डॉक्टरांचा जागीच मृत्यू झाला असून एक जण जखमी झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, सदर ठिकाणी वारंवार होणारे अपघात टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) दि. १८ मे, २०१५ रोजी पिंपळगाव (बसवंत) कडे निघालेली महिंद्रा एक्सयुव्ही ५०० ही गाडी कोकण गाव फाट्याजवळील स्पीटब्रेकरजवळ कंटेनरला मागून धडकल्यामुळे झालेल्या अपघातामध्ये ५ डॉक्टरांचा जागीच मृत्यु झाला असून १ डॉक्टर जखमी झाला आहे.
(२) सदर अपघात प्रकरणी पोलीसांनी केलेल्या चौकशी मध्ये सदर अपघात महिंद्रा एक्सयुव्ही या गाडीच्या वाहनचालक डॉक्टराच्या चुकीमुळे घडला असल्याचे निष्पन्न झाले आहे.
(३) सदर महामार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्याकडून बांधला जात आहे. अपघात घडलेल्या ठिकाणी महामार्गावर रम्बलर स्ट्रीप्स बसविले असून थर्मोप्लास्टीक मार्कींग करण्यात आले तसेच महामार्गालगत सदर ठिकाणी जंक्शन असल्याचे, मार्गावर रम्बलर स्ट्रीप्स लावल्याचे आणि सदर परिसर अपघातप्रवण क्षेत्र असल्याचे फलक लावण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील वातानुकूलित बसेसना बुलेटप्रूफ काचा लावण्यात आल्याबाबत**

**(७४) * १६९८८ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वातानुकूलित बसेसना बुलेटप्रूफ काचा लावण्याच्या नावाखाली मेसर्स टॉपचे या कंपनीच्या कंत्राटदाराने बेस्टला ४८ कोटी रुपयाला फसविल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेस्टच्या ४८ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर कंपनीवर व सदर गैरव्यवहाराच्या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भिंवडी-निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(७५) * २०७१९ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी-निजामपूर महानगरपालिकेच्या सन २०१२ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत अत्यावश्यक असलेला "ठेकेदार नसल्याचा दाखला" भिंवडी मनपाचे शहर अभियंता श्री.सलिम शेख यांनी कायद्याचे उल्लंघन करुन विद्यमान नगरसेवक असलेले संतोष मंजैया शेट्टी व शशिलता संतोष शेट्टी यांना दिला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, भिंवडी महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०१२ मध्ये झालेल्या निवडणुकीत अत्यावश्यक असलेला ठेकेदार नसल्याचा दाखला ज्या व्यक्ती ठेकेदार नसतात अशांसाठी दिला जात होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी तेथील लोकप्रतिनिधी यांनी भिंवडी मनपाचे शहर अभियंता यांनी पदाचा दुरुपयोग करुन केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करावी व त्यांचेवर निलंबनाची कायदेशीर कारवाई करावी याबाबत लोकायुक्त यांना दिनांक २७ मार्च, २०१५ रोजी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू पत्राच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

परंतु श्री.संतोष मंजैया शेट्टी व सौ.शशीलता संतोष शेट्टी यांचे दिनांक २२.३.२०१२ च्या अर्जानुसार ह्या दोन्ही अर्जदारांना शहर अभियंता, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांनी दिनांक २६.३.२०१२ च्या पत्रान्वये बांधकाम विभागाच्या दप्तरी ठेकेदार म्हणून नोंद आढळून येत नाही असे कळविण्यात आले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २७.३.२०१५ रोजी तक्रार केली. याबाबत मा.लोकायुक्त कार्यालयाने तक्रारदाराने आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर गुणवत्तेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बोरीवली (प) मुंबई येथील चंदावरकर रोडवर महानगरपालिकेने बांधलेली प्रसूतीगृहाची दुमजली इमारत नोबेल मेडिकल सेंटरला नाममात्र भाड्याने दिल्याबाबत**

**(७६) * १७०३३ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली (प) मुंबई येथील चंदावरकर रोडवर महानगरपालिकेने बांधलेली प्रसूतीगृहाची दुमजली इमारत सन २००४ मध्ये नोबेल मेडिकल सेंटरला नाममात्र भाड्याने दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रसुतीगृहात गरिब महिलांना प्रसुतीसाठी पालिका नियमानुसार प्रवेश देण्यात यावा असे बंधन घातले असतानाही, सदर रुग्णालयाचा वापर बायपास, अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टी अशा मोठ्या शस्त्रक्रियेसाठी होत असून, या प्रसूतीगृहात गेल्या ११ वर्षांत केवळ १२४ महिलांची प्रसूती झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, प्रसुतीगृहाचा गैरवापर करणा-या नोबेल मेडिकल सेंटरवर तसेच त्यांना संरक्षण देणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यामार्फत चौकशी केली असता, सदर संस्थेने कराराच्या अटी व शर्तीचा भंग केल्याचे आढळून आले आहे.

त्यामुळे सदर संस्थेस करारातील अटी व शर्तीचा भंग केल्याप्रकरणी दिनांक १३.११.२०१४ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

या कारणे दाखवा नोटीशीला सदर संस्थेने दिलेले उत्तर समाधानकारक नसल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य खात्यामार्फत संस्थेबरोबर केलेला करार रद्द करण्याची प्रक्रिया चालू आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत करण्याबाबत**

**(७७) * २१३४६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत करण्यासाठी कार्यवाही व्हावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मुख्याधिकारी, पनवेल नगरपरिषद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीटी, मेट्रो प्रकल्प, सेझ प्रकल्प यामुळे नागरीकरणाचा वाढता वेग पाहता पनवेल शहराच्या प्राथमिक सुविधांवर मोठ्या प्रमाणात ताण पडणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेत करण्याचा निर्णय शासनाने सन १९९१ मध्ये घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग क्र. २ नुसार शासनाने उक्त प्रकरणी पनवेल नगरपरिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर करण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

पनवेल महानगरपालिका स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे दिनांक २५.२.२०१५ रोजीचे निवेदन पनवेल नगरपरिषदेस प्राप्त झाली आहेत.

(२) होय.

(३), (४) व (५) दिनांक २५.९.१९९१ अन्वये पनवेल महानगरपालिका स्थापन करणेकामी नगर विकास विभागामार्फत अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. तथापि, याबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडून अहवाल अप्राप्त आहे.

उक्त अधिसूचना प्रसिध्द केल्यानंतर पनवेल शहराची लोकसंख्या, शहरीकरणाचे प्रमाण इ. बाबींमध्ये अमुलाग्र बदल झालेला आहे.

पनवेल महानगरपालिका स्थापन करावयाची झाल्यास उक्त बदल विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार नव्याने अधिसूचना प्रसिध्द करावी लागेल.

-----------------

**मुंबई शहरात अत्यंत धोकादायक असलेल्या सेस बिल्डींगची पुनर्बांधणी करण्याबाबत**

**(७८) * १९६९९ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात अत्यंत धोकादायक असलेल्या १४८५८ सेस बिल्डींगची पुनर्बांधणी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारती मोकळ्या करून येथील कुटुंबासाठी ट्रान्झीट कॅम्प बांधण्यासाठी केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेली बीपीटीची १३७०० एकरची जागा घेण्याचाही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीपीटीची जागा घेण्यासाठी राज्य शासनामार्फत केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय, केंद्र शासनाने सदर जमीन राज्य शासनास देण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाद्वारे मुंबई शहर बेटावरील उपकरप्राप्त इमारतींच्या करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणामध्ये धोकादायक व मोडकळीस आल्याचे आढळलेल्या इमारतींची आवश्यकतेनुसार दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्याची कार्यवाही करण्यात येते. गृहनिर्माण विभागाच्या नवीन प्रस्तावित गृहनिर्माण धोरणाच्या मसूद्यामध्ये उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचा कार्यक्रम गतीमान करण्याच्या उद्देशाने प्रचलित धोरणामध्ये सुसुत्रता आणण्याचे धोरण प्रस्तावित करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडसा देसाईगंज (जि.गडचिरोली) नगरपरिषदेने रस्ता दुभाजकाच्या विद्युतीकरणाचे काम नियमबाह्य पणे केल्याबाबत

**(७९) * २३४११ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील वडसा देसाईगंज नगरपरिषदेने ब्रम्हपूरी-लाखांदूर रस्ता दुभाजक तयार करुन मध्यभागी विद्युतीकरण करण्यासाठी रुपये १ कोटी ९२ लक्ष ६१६ इतक्या रकमेचे अंदाजपत्रक असलेले काम मे.सोम इलेक्ट्रिक नागपूर यांना नियमबाह्य पणे देण्यात आले असल्याची माहिती दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाच्या निविदा मंजूर करण्यासाठी १९ अटी व शर्ती ठेवण्यात आले असताना सुध्दा अट क ११ चा भंग करुन कामाची सुरुवात न करताच कंत्राटदारास नियमबाह्य व बेकायदेशिर रित्या रुपये ६४ लक्ष ७२ हजार ५६५ इतकी अग्रिम रक्कम त्यांना देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष, मुख्याधिकारी आणि मे. सोम इलेक्ट्रिक नागपूर यांच्या संगनमताने झालेल्या आर्थिक व्यवहारामुळेच सदर काम नियमबाह्य करण्यात आले असल्याने या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येणार आहे व त्याचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि अशा आशयाची बातमी दिनांक ०३ मे, २०१५ रोजीच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणाची चौकशी करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी गडचिरोली यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई विमानतळाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाबाबत**

**(८०) * १७२३८ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई विमानतळाचा महत्वाकांक्षी प्रकल्प अनेक वर्षापासून प्रलंबीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी केंद्राच्या आवश्यक त्या परवानग्या मिळवून २०१५ वर्षाच्या अखेरपर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात येतील असे महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांनी स्पष्ट केल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई विमानतळाचा महत्वाकांक्षी प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) विमानतळ प्रकल्पाविषयीच्या सर्व महत्वाच्या मान्यता नागरी उड्डाण मंत्रालय, पर्यावरण मंत्रालयाकडून पर्यावरण व किनारपट्टी नियामक विषयक मान्यता, संरक्षण मंत्रालयाकडील संरक्षण विषयक मान्यता प्राप्त झाल्या आहेत. भूसंपादन, पुन:स्थापना आणि पुनर्वसन प्रगती पथावर आहे. सरकारी खाजगी भागीदारी त्वावर विमानतळावर विकासकाच्या निवडीची प्रक्रिया चालू असून डिसेंबर, २०१५ पर्यंत विकासकाची निवड अपेक्षित आहे.

(३) शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार भूसंपादन प्रक्रिया सुरु असून पुनर्वसन व पुनस्थापना निवाडे घोषित करण्यात आले आहेत. विमानतळाजवळ विकसित करण्यात येत असलेल्या पुष्पकनगर या अत्याधुनिक वसाहतीमध्ये २२.५ टक्के योजनेनुसार विकसित भुखंड प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणार आहेत. विकासपूर्व कामांच्या (भूविकास) निविदा प्रकियेस सुरुवात करण्यात आली आहे.

सिडकोने जागतिक स्तरावरील निविदेद्वारे विमानतळ विकसीत करण्यासाठी प्राप्त आरएफक्यू अर्जाची पूर्व अर्हता प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे भाडेंवाडी पारडी (ता.जि.नागपूर) येथील मस्जिद, इदगाह व कब्रस्तान ट्रस्टच्या जमिनीवरील बेकायदेशीर फेरफाराबबत**

**(८१) * २४७६७ श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मस्जिद, इदगाह व कब्रस्तान ट्रस्ट, भांडेवाडी, पारडी (ता. जि.नागपूर) च्या खसरा नं.६,७ व १३ वरील क्रमश: २.३२, ०.७९ व ३.२३ एकर क्षेत्रफळ असलेल्या जमिनीची फेरफार नोंदवही (फेरफार पत्रक) वर नोंद क्रमांक ३७ अ नुसार महाराष्ट्र राज्य या नावाने परस्पर फेरफार नोंद करुन मस्जिद इदगाह व कब्रस्तान ट्रस्टचे नाव फेरफार नोंदवहीतून काढून टाकण्यात आल्या प्रकरणी चौकशीची मागणी विविध सामाजिक, धार्मिक संस्थाचे पदाधिकारी, जागरुक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (महसूल) मा.राज्यमंत्री (महसूल) मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.राज्यमंत्री (नगरविकास), जिल्हाधिकारी (नागपूर) यांचेकडे माहे ऑक्टोबर २०१४ मध्ये वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनातर्फे चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती दोषीविरोधात कोणती प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली वा प्रस्तावित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) यासंदर्भात लेखी निवेदने प्राप्त झाली आहेत.

मौजा भांडेवाडी (ता.जि.नागपूर) येथे खसरा क्र. ६ (आराजी ०.९४ हे. आर), खसरा क्र. ७ (आराजी ०.३२ हे.आर) व खसरा क्र.१३ (आराजी १.३१ हे.आर) या जागेवर तत्कालीन तलाठी यांनी दि.२५.२.८३ ला फेरफार पंजी नोंदवहीत अ.क्र.३७ वर मस्जिद, इदगा कब्रस्तान भांडेवाडी (पारडी) ट्रस्ट अशी नोंद घेतली होती. मात्र सदर नोंद तलाठी यांनी रद्द केली आहे. सदर नोंद सक्षम अधिकारी यांनी प्रमाणित केली नसल्यामुळे त्यास कुठलाही कायदेशीर मान्यता नाही. सदर जमीन “झुडपी जंगल” या सदराखाली मोडत असल्यामुळे सदर फेरफार मंजूर करण्यात आला नसल्यामुळे सदर जमीन “महाराष्ट्र सरकार” म्हणून अभिलेखात नोंद आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मध्यवर्ती कारागृहातील अनागोंदी कारभाराबाबत

**(८२) * १६३०९ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मध्यवर्ती कारागृहातील अनागोंदी कारभाराबाबत मा.मुख्यमंत्री यांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास दिलेल्या आदेशानुसार चौकशी करणाऱ्या लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस महासंचालकांनी आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(२) असल्यास, अहवालातील प्रमुख निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) अहवालातील प्रमुख निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत :-

- बंदी पलायनास त्यावेळी कारागृहात कार्यरत असलेले ५ अधिकारी व ६ कर्मचारी जबाबदार असणे.
- स्थानिक पोलिसांकडून कारागृहांची तिमाही सुरक्षा तपासणी करणे.
- कारागृहाच्या वॉच टॉवरच्या संख्येत वाढ करुन निगराणी प्रक्रियेसाठी सर्च लाईट्स व बायनोक्युलर्सची व्यवस्था करणे.
- कारागृह परिसरात कार्यरत शासकीय कार्यालये इतरत्र स्थलांतरीत करणे.
- कारागृहातील बंद्यांना वैद्यकीय उपचारासाठी इतरत्र नेण्यापेक्षा कारागृहीन वैद्यकीय व्यवस्था सुदृढ करणे. तसेच, बंद्यांची न्यायालयीन ने-आण टाळण्यासाठी व्हिडीओ कॉन्फरन्सची व्यवस्था कार्यान्वित करणे.
- कारागृह प्रशासनातील उणीवा दूर करण्यासाठी सदर प्रशासनात रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक आहे.
- कारागृह उपमहानिरीक्षक व कारागृह अधीक्षक या पदी नियुक्तीसाठी सैन्य दलातील समकक्ष पदावरुन सेवनिवृत्त झालेल्या अधिका-यांना नियुक्त करणे.

- पोलिस व कारागृह विभागातील समकक्ष पदांची भरती प्रक्रिया एकत्रित राबवणे.

अहवालातील उपरोक्त प्रमुख निष्कर्षांच्या अनुषंगाने शासनामार्फत करण्यात आलेली कार्यवाही खालील प्रमाणे आहे :-

- दोषी अधिकारी व कर्मचा-यांना निलंबित करण्यात आले असून त्यांचे विरुध्द प्रस्तावित विभागीय चौकशीस शासनाने मान्यता दिली असून त्यांच्या विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.
- स्थानिक पोलिसांमार्फत राज्यातील कारागृहांची प्रथम सुरक्षा पडताळणी करण्यात आली आहे व सदरतिमाही प्रक्रिया पुढे कार्यरत ठेवण्याचे निदेश देण्यात आले आहेत.
- अहवालातील इतर बाबींच्या अनुषंगाने संबंधीत विभागांच्या सचिवांसमवेत अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.५.२०१५ रोजी बैठक घेऊन अहवालातील प्रशासकीय व सुरक्षा पध्दतीत सुधारणा करण्यासंबंधी कार्य पध्दती व कालावधी निश्चित करण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या मास्टर लिस्टमधील घराचे बनावट पुरावे सादर केल्याबाबत

**(८३) * १९६८७ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संजय पोतनीस (कलिना) : तारांकित प्रश्न क्रमांक ५८९३ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या मास्टर लिस्टमधील घराचे बनावट पुरावे सादर करून घेतलेल्या ५१ प्रकरणाची मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकाऱ्यांकडून करण्यात येत असलेली चौकशी पूर्ण केली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाच्या चौकशीनुसार किती व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१), (२) बृहत्सुचीवरुन गाळे वितरणासाठी प्राप्त झालेल्या अर्जदार व संबंधित कार्यकारी अभियंता यांच्या सुनावणी दरम्यान १५ अर्जदारांनी सादर केलेली मतदार यादी प्रथमदर्शनी बनावट असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे ३६ अर्जदारांनी सादर केलेली निष्कासन सुचना, भाडेपावती, विद्युत देयक इत्यादी कागदपत्रे प्रथमदर्शनी बनावट असल्याचे निदर्शनास आले. सदर ५१ अर्जदारांच्या नस्त्या मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आल्या.

याबाबत मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी यांनी म्हाडा प्राधिकरणाच्या याबाबतचा ठराव क्र. ६५२० दि.०३.०३.२०११ अन्वये अर्जदारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची शहानिशा/तपासणी करण्याचा अधिकार व निर्णय घेण्याबाबत अधिकार बृहत्सुची समितीस प्रदान करण्यात आले आहेत, असे कळविले आहे.

अर्जदाराची कागदपत्रे बनावट आढळल्यास त्यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याच्या प्रस्तावास उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी मान्यता दिली आहे. याप्रमाणे प्रकरणनिहाय योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये नैना प्रकल्पातील गावांसाठीचा विकास आराखडा तयार करण्याबाबत**

**(८४) * १९९०९ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये नैना प्रकल्पातील पहिल्या २३ गावांसाठीचा अंतरिम विकास आराखडा सिडकोने दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान प्रसिध्द केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास आराखडा तयार करताना भूमीपुत्रांना त्याबाबतची माहिती देण्यात आली आहे काय अथवा भूमीपुत्रांसाठी कोणकोणत्या सवलती व लाभ देण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत तसेच नैना प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण होणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसुचित क्षेत्राच्या (नैना) २३ गावांसाठीची प्रारुप अंतरिम विकास योजना सिडकोने दि. १३/८/२०१४ रोजी आम जनतेकडून हरकती/ सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द केली आहे.

(२) नैना योजना एक आदर्श सहभागी विकास नमुना आहे ज्यामध्ये नियोजनबध्द विकास होण्यासाठी जमीन एकत्रीकरणास प्रोत्साहन दिले आहे. जमीन मालक स्वेच्छेने पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी जमीन सिडकोकडे प्रत्यर्पित करतो ज्याच्या बदल्या त्यांना उर्वरित जमिनीवर अशा प्रत्यर्पित केलेल्या जमिनीचा चटई क्षेत्र निर्देशांक वापरता येतो.

(३) लागू नाही. मात्र, या योजनेतील विकसित करावयाच्या पायाभूत व सामाजिक सुविधांवर होणारा खर्च हा अंदाजित ७३६४ कोटी रुपये अपेक्षित असून पायाभूत व सामाजिक सुविधांचा विकास हा आराखडा मंजूर झाल्यानंतर ५ ते १० वर्षात पुर्ण करण्याचे उद्दिष्ट सिडकोने ठेवले आहे.

-----------------

## कोरपना (जि.चंद्रपूर) येथील मुरली ॲग्रो सिमेंट कंपनीत काम करणा-या कंत्राटी कामगारांना वेतन अदा करण्याबाबत

**(८५) * २२१७८ श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपूर) येथील मुरली ॲग्रो सिमेंट कंपनीने मागील चार महिन्या पासून कंपनीतील कर्मचारी आणि कंत्राटी कामगारांना वेतन अदा केले नसल्यामुळे कंपनीत काम करणा-या चार कर्मचा-यांनी स्वतःच्या अंगावर रॉकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न दिनांक २८ मे, २०१५ रोजी वा त्या दरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने उक्त कंपनीतील कर्मचा-यांचे थकीत वेतन अदा करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कामगारांना थकीत वेतन मिळण्याबाबत केंद्र शासनाच्या सहाय्यक श्रम आयुक्त (केंद्रिय) चंद्रपूर यांनी कामगार संघटना व मुरली इंडस्ट्रजच्या व्यवस्थापनास चर्चेकरीता वेळोवेळी पाचारण केले असून औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या

कलम ३३ (सी)(१) अन्वये व्यवस्थानाकडून घेणे असलेल्या कामगारांच्या थकीत वेतनाबाबातचे विवरण कामगार संघटनेने सहाय्यक श्रम आयुक्त (केंद्रिय) चंद्रपूर यांच्याकडे सादर करण्याबाबत सांगीतले आहे. जेणेकरुन, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना वसूली प्रमाणपत्र पाठवून व्यवस्थापनाकडून थकीत असलेल्या कामगारांच्या वेतनाची रक्कम वसूल करता येईल.

----------------

**अकोला एमआयडीसीतील अॅग्रो इंडस्ट्रीजमध्ये बाल मजूराचा झालेला मृत्यू**

**(८६) * १७०३४ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोल्याच्या एमआयडीसीतील अॅग्रो इंडस्ट्रीजमध्ये काम करणारा १४ वर्षाचा बाल मजूराचा हरभ-यांच्या गोणीखाली सापडून दिनांक २६ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास तडफडून मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्यात बाल मजूरीला पायबंद घालण्याच्या दृष्टीने, शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अकोला एमआयडीसी येथील गर्ग अॅग्रो इंडस्ट्रिज या कारखान्यात दिनांक २६ एप्रिल, २०१५ रोजी अपघात झाला असून या अपघातात १७ वर्षे वयाच्या एका कामगाराचा मृत्यू झाला व १६ वर्षे वयाचा एक कामागार जखमी झाला, अशी वस्तुस्थिती आहे.

(२) होय, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे.

चौकशीत असे आढळून आले की, सदर कारखान्यात हरभऱ्यापासून डाळ बनविण्यात येते. त्यासाठी कच्चा माल म्हणून लागणारा हरभरा गोण्यामध्ये साठविलेला असतो. कारखान्यात काम करत असताना रचलेल्या हरभऱ्यांच्या गोण्यांचा ढीग कोसळून त्याखाली एका कामागराचा मृत्यू झाला व दुसऱ्या कामगाराच्या पाठीला मार लागल्याने त्याला ताबडतोब दवाखान्यात भरती करण्यात आले. सदर जखमी कामगारास उपचारानंतर दोन दिवसांनी घरी सोडण्यात आले.

कारखाना व्यवस्थापनाच्या गलथानपणामुळे दुर्घटना घडल्याचे निदर्शनास आल्याने व्यवस्थापनाविरुध्द कारखाने अधिनियम, १९४८ तसेच महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील तरतुदीच्या भंगाबाबत मा.न्यायालयात खटला दाखल करण्यात आला असून पोलीस यंत्रणेने भा.दं.वि. च्या कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे.
(३) व (४) बालकामगार (प्रतिबंध व नियमन), कायदा १९८६ ची प्रभावी अंमलबजावणी तसेच बालमजुरी विरुध्द व्यापक जनजागृती कार्यक्रमासाठीचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच बालमजुरीच्या अनिष्ट प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी राज्य शासनाने कृती आराखडा केलेला आहे.

-----------------

**मौजे कापशी (ता.जि.अकोला) गावातील ग्रामस्थांना पोलिसांनी मारहाण केल्याबाबत**

**(८७) * १६३१२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.जीवा गावित (कळवण), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कापशी (ता.जि.अकोला) गावात जुगारावर छापा टाकण्यासाठी गेलेल्या पोलीसांवर हल्ला करण्यात आल्याच्या कारणास्तव १५० पोलीसांनी गावातील प्रत्येक घरात घुसून ग्रामस्थ, गर्भवती महिला, वृध्द, लहान मुले यांच्यासह सर्वांना बेदम मारहाण करुन गावातील गेटलाईट, टी.व्ही. आणि खिडक्यांच्या काचा फोडल्या तसेच घरांचे दरवाजे, कुलर, १०० हून अधिक वाहनांची तोडफोड तसेच गुरांनाही मारहान केल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित पोलीसांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी सहाय्यक पोलीस अधीक्षक, अकोला यांना पोलीस ठाणे, पातुर हद्दीत ग्राम कापशी तलाव याठिकाणी अक्षयतृतीयेनिमित्त मोठ्या प्रमाणात जुगार खेळला जात आहे अशी माहिती मिळाल्यानुसार त्याठिकाणी पोलीसांनी धाड घातली असता जुगार खेळणाऱ्या माणसांनी व इतर १००-१५० माणसांनी पोलीस पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना जखमी केले.

याबाबत पोलीस ठाणे पातुर येथे गु.र.क्र.३९/२०१५, भा.दं.वि.कलम ३५३,३३२,३३६,१४३,१४७,१४८,१४९,४२७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. या प्रकरणी दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी ग्रामस्थांच्यावतीने विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती यांना निवेदन देण्यात आले. सदर निवेदनाच्या अनुषंगाने संपुर्ण प्रकरणाची चौकशी करुन ४ कर्मचाऱ्यांना निलंबीत करण्यात आले आहे व इतर सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नामदेव पाटील वाडी, मानपाडा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील बिल्वदल इमारती मधील बेघर व्यक्तींचे पूनर्वसन करण्याबाबत

**(८८) * १९९१२ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण तालुक्यातील डोंबिवली येथील नामदेव पाटील वाडी मानपाडा रोडवरील बिल्वदल इमारतीला तडे गेल्याने महानगरपालिकेच्या स्ट्रक्चर ऑडीटच्या अहवालात सदर इमारत धोकादायक दाखवून दिनांक १२ ऑगस्ट, २०१४ रोजी पाडण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीमधील बेघर झालेल्या ४८ कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यासाठी वाढीव एफ.एस.आय. देण्याचे शासनाने मान्य केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीमधील रहिवाश्यांचे अद्याप पुनवर्सन झाले नसल्याने रहिवाश्यांचे हाल होत असल्याने इमारतीमधील बेघर झालेल्या ४८ कुटुंबियांचे पुनर्वसन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये धोकादायक अधिकृत / भाडेकरु व्याप्त इमारतीच्या पुनर्विकासाबाबतची तरतूद असून, सदर तरतुदींतर्गत संबंधितांचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.